नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com


## उत्तराखंडनंतर हिमाचलच्या किन्नौरमध्ये ढगफुटी

**कैलास यात्रा थांबवली**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :**
मान्सूनच्या पावसाने पर्वतांवर आपत्ती आणली आहे. हिमाचल प्रदेशातील किन्नौरमधील टांगलिंग येथे बुधवारी ढगफुटीमुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली.

अचानक आलेल्या पुरामुळे कैलास यात्रा मार्गावरील दोन पूल वाहून गेले. उर्वरित मार्गाचेही मोठे नुकसान झाले, त्यामुळे यात्रा थांबवण्यात आली आहे. अनेक भाविक अडकले आहेत. इंडो-तिबेटीयन बॉर्डर पोलिस टीमने झिपलाइनच्या मदतीने ४१३ यात्रेकरूंना वाचवले आहे. किन्नौरमधील रिब्बा गावाजवळील रालडांग दरीत ढगफुटी झाली. यामुळे राष्ट्रीय महामार्ग-५ देखील बंद करण्यात आला आहे.


* वर्ष ५५ * अंक १२९ * * नागपूर * गुरुवार, दिनांक ७ ऑगस्ट २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


# महाराष्ट्राचे ३४ पर्यटक उत्तराखंडमध्ये बेपत्ता?

### आंबेगावच्या १९, धरणगावच्या १५ पर्यटकांचा समावेश : धराली ढगफुटीनंतर संपर्क तुटला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
उत्तराखंडच्या धराली येथील ढगफुटीनंतर महाराष्ट्रातील तब्बल ३४ पर्यटकांशी संपर्क होत नसल्याची बाब पुढे आली आहे. यात पुणे जिल्ह्यातील १९ व जळगावच्या धरणगाव तालुक्यातील १५ पर्यटकांचा समावेश आहे. प्रशासनातर्फे सध्या या पर्यटकांशी संपर्क साधण्याचा युद्ध पातळीवर प्रयत्न केला जात आहे.

उत्तराखंडच्या धराली गावात मंगळवारी भयंकर ढगफुटी झाली होती. त्यानंतर नदीला आलेल्या पुरात अख्खे गावच भूईसपाट झाले होते. या घटनेत आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर ५० हून अधिक जण बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. त्यातच महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, जळगाव, नांदेड आदी जिल्ह्यांतील अनेक पर्यटक उत्तराखंडच्या पर्यटनासाठी गेले होते. यापैकी ३४ पर्यटकांशी संपर्क होत नसल्यामुळे काळजी वाढली आहे.

वृत्तानुसार, आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथील १९९० च्या १० वीच्या बॅचमधील ८ पुरुष व ११ महिलांचा एक समूह पर्यटनासाठी १ ऑगस्ट रोजी उत्तराखंडला रवाना झाला होता. या सर्वांचा





गंगोत्री परिसरातून शेवटचा संपर्क झाला होता. मंगळवारी दुपारी धराली येथे ढगफुटी झाली तेव्हा हा समूह त्याच भागात होता. या समुहातील एका महिलेने आपल्या मुलाशी फोन करून आपण सर्वजण सुखरूप असल्याचे कळवले होते. पण त्यानंतर त्यांच्याशी कोणताही संपर्क झाला नाही.

जळगावच्या धरणगाव तालुक्यातील पाळधी येथील १५ भाविकांचा एक समूह उत्तराखंडच्या दौऱ्यावर गेला होता. त्यांचे नातलग कालपासून त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत. पण त्यांच्याशी संपर्क होत नसल्याचे समजते.

दुसरीकडे, सोलापूरचे ४ तरुणही गंगोत्री परिसरात अडकलेत. त्यांच्याशीही संपर्क करण्यात अडथळे येत आहेत. विठ्ठल पुजारी, समर्थ दसरे, धनराज बगले, मल्हारी थोटे अशी या तरुणांची नावे आहेत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# खुनशी ट्रम्पची फोतरी

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या हिंस्त्र श्वापदापासून भारत सरकारने आपल्या शेतकऱ्यांना वाचवण्याची मोठीच कामगिरी पाडली आहे. त्याबद्दल सर्वात प्रथम आपल्या सरकारचे अभिनंदन करायलाच पाहिजे. सध्याच्या परिस्थितीमध्ये डोनाल्ड ट्रम्प नावाचा अतिहिंस्त्र नरपशु अत्यंत क्रूर झालेला आहे. तो नागासारखा डूख धरतो, तरीही भारताने त्याचा फणा जवळजवळ ठेचलेलाच आहे त्यामुळेच त्याचे ते चिडणे स्वाभाविक आहे. अमेरिकेने भारताबरोबर झालेल्या शेतीमालाचा मुद्दा प्राधान्याने समोर ठेवला होता. जीएम सोयाबीन तसेच जीएम मका आणि पोल्ट्री व्यवसाय, गहू तांदूळ उत्पादन, त्यासोबतच डेरी उत्पादनासाठी भारताने आपली बाजारपेठ खुली करावी यासाठी अमेरिकेने दहा हजार टनाचे वजन भारतावर लादले होते. त्यानंतर मग चर्चेवर चर्चा पुन्हा चर्चा, पुन्हा एक चर्चा, पुन्हा दुसरी चर्चा आणि पुन्हा तिसरी चर्चा अशा पाच फेऱ्या होऊनही भारताने अमेरिकेची मागणी बिलकुल मान्य केली नाही. एकतर आपल्या देशात जीएम पिकांना परवानगी नाही, याचे कारण त्याला मुळातच संघ आणि भाजपचा आधीपासूनच विरोध आहे. डेअरीच्या बाबत म्हणाल तर भारताच्या तुलनेने अमेरिकन दूध उत्पादक तीनशे पटीने श्रीमंत आहेत. अमेरिकेतील शेतकऱ्यांच्याकडे शेकड्याने जनावरे असतात मात्र, आपल्या देशात शेतकऱ्यांकडे एक तर जनावरे नसतातच आणि असली तरी त्यांची सरासरी फक्त दोन ते तीन टक्के असते. अमेरिकेत या डेरी उत्पादकांना मोठ्या प्रमाणात सरकारी अनुदान घवघवीत पद्धतीने मिळते त्यामुळे त्यांची उत्पादने भारतापेक्षा ६० ते ७० टक्के कमी दरामध्ये तयार होतात. शेतीच्या बाबतीत म्हणाल तर अमेरिकेत फक्त पाच ते सात टक्के शेतकरी आहेत विशेष म्हणजे त्या देशातील गरीब शेतकऱ्यांच्या जवळही कमीत कमी ७०० ते ८०० एकर शेती आहे, यावरून आपल्याला तेथील शेतकऱ्यांच्या गरिबीची कल्पना येईल. तेथील शेतकरी प्रत्येक बाबतीत आघाडीवर आहेत त्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च भारतापेक्षा खूपच कमी आहे. भारतात उत्पादन खर्च जास्त आहे आणि प्रत्यक्षात उत्पन्न झाल्यावर शेतकऱ्यांना मिळणारी किंमत कमी आहे अशी खरीखरी परिस्थिती आहे. अशा परिस्थितीमध्ये भारताने अमेरिकेचा माल आयात करणे म्हणजे शेतक?यांच्या आत्महत्यांमध्ये किमान शंभर ते सव्वाशे पटीने वाढ करण्यासारखे होते. बरं त्यात खरी गोम अशी आहे की, अमेरिकेची शेती उत्पादने मोठ्या प्रमाणावर चीन आयात करीत होता. आता चीनने ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना, ब्राझील यासारख्या देशातून शेतमाल आणि खाण्यापिण्याच्या वस्तू खरेदी करणे सुरू केलेले आहे. त्यामुळे अमेरिकेला दीडशे कोटी लोकांच्या भारताची बाजारपेठ हवी आहे आणि तीही स्वतःच्या अटी शर्तीनुसार हवी आहे. असल्या भयानक जाचक आणि तुघलकी अटींमुळे भारताचा शेतकरी बरबाद होईल हे ठाऊक असले तरी, या ट्रम्पासारख्या पंपाला भारताची तहान भागवण्यासाठी पाणी देण्याची गोष्टही मान्य नाही. म्हणजेच भारताच्या प्रचंड कर्जात असलेल्या शेतकऱ्यांचे अश्रू त्या हिंस्त्र श्वापदाला दिसतच नाहीत पण आपल्या भारताच्या सरकारला त्या अश्रूंचे आणि त्यामागील मेहनतीचे मोल कळलेले आहे. त्यामुळेच चिडून जाऊन अमेरिकेच्या या तुघलकाने भारतावर २५ टक्के आयात शुल्क लावलेले आहे. त्यातल्या त्यात भारतातील औषधे आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू अमेरिकेने आयात शुल्कापासून वगळलेल्या आहेत. त्यामुळे भारताला फार मोठा फटका बसला असे वाटत नाही म्हणूनच आपण अमेरिकेच्या दादागिरीला झुगारून टाकलेले आहे, हे यातून स्पष्ट दिसत आहे. आपल्या भारतातील शेतकऱ्यांना अमेरिकेच्या शेतकऱ्यांबरोबर येण्यासाठी निकट भविष्य काळामध्ये कोणतीही संधी नाही. या देशातला शेतकरी आपली शेती जोपर्यंत अदानी सारख्या महाविक्राळांच्या ताब्यात देत नाही तोपर्यंत अमेरिकेची डाळ भारतात शिजणार नाही. सरकार कोणाचेही असले तरी कोणीच असा निर्णय घेऊ शकणार नाही. पुढील साडेतीन वर्ष जगाला या हिंसक मनोवृत्तीच्या डोनाल्ड ट्रम्पाला झेलावे लागेल. त्यानंतर अमेरिकेच्या जनतेला आणि जनभावनेला पुन्हा बहर येईल अशी आशा आपण करूया. मनमानी करणा?या ट्रम्पच्या शेतकरी आणि शेती विषयक अटी आपल्या भारताने झुगारल्याबद्दल आपल्या सरकारचे कोटी कोटी आभार !


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# गलवान संघर्षानंतर पीएम मोदी पहिल्यांदाच चीनला भेट देणार



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :**
पंतप्रधान मोदी एससीओ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनला भेट देणार आहेत. हा दौरा ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी होणार आहे. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या भारत-चीन लष्करी संघर्षानंतर मोदींचा हा पहिला चीन दौरा असेल.

२०१८ मध्ये मोदींनी यापूर्वी तेथे भेट दिली होती. पंतप्रधान म्हणून ढट मोदींचा हा सहावा चीन दौरा असेल, जो ७० वर्षांत कोणत्याही भारतीय पंतप्रधानांनी चीनला दिलेल्या सर्वाधिक भेटी आहेत. चीनला जाण्यापूर्वी, पंतप्रधान मोदी ३० ऑगस्ट रोजी जपानला पोहोचतील. येथे ते भारत-जपान शिखर परिषदेत सहभागी होतील.

# अखेर ठाकरे बंधूंची युती झालीच!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ :**
मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांचा रणसंग्राम अद्याप सुरू झालेला नसतानाच, मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या निवडणुकीत एक मोठी राजकीय घडामोड घडली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) युती करत बेस्ट कामगार पतपेढीची निवडणूक एकत्र लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या युतीला स्थानिक स्वराज्य संस्था आणि मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

बेस्ट उपक्रमाच्या कामगार पतपेढीची निवडणूक येत्या १८ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे. शिवसेनादोघांनी एकत्र येत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

# ट्रम्पचा भारतावर २५% अतिरिक्त टॅरिफ

### २१ दिवसांनंतर लागू होईल : आता एकूण ५०% टॅरिफ

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. ६ :**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारतावर २५% अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली आहे. त्यांनी गुरुवारी यासंबंधीच्या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. हा आदेश २७ ऑगस्टपासून लागू होईल.



यापूर्वी त्यांनी ३० जुलै रोजी २५% कर जाहीर केला होता. आता अमेरिका भारतावर एकूण ५०% कर लादणार आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे ट्रम्प यांनी भारताविरुद्ध ही कारवाई केली आहे.

ट्रम्प यांनी आजच्या कार्यकारी आदेशात लिहिले आहे की, भारत सरकार रशियाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तेल आयात करत आहे. अशा परिस्थितीत, अमेरिकेत येणाऱ्या भारतीय वस्तूंवर २५% अतिरिक्त शुल्क लागू होईल. हे शुल्क २१ दिवसांनंतर लागू होईल, असे सांगण्यात येत आहे.

# मतदान शाळेत नको भाजपच्या कार्यालयात घ्या!



**निवडणूक आयोगाला बच्चू कडू यांचा टोला**

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ :**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशीनचा वापर न करण्याच्या मुद्यावरून प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी यांनी निवडणूक आयोगावर तिखट हल्ला चढवाल आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर होत नसेल तर मतदान शाळेत घेण्याची काहीच गरज नाही. ते भाजपच्या कार्यालयात घेतले गेले पाहिजे, असे ते म्हणालेत.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी राज्यात डिसेंबर - जानेवारी महिन्यात टप्प्याटप्याने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होणार असल्याची माहिती दिली. यावेळी त्यांनी या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर होणार नसल्याचेही स्पष्ट केले होते. त्यांच्या या निर्णयावर आता विरोधी पक्ष सडकून टीका करत आहेत. माजी आमदार बच्चू कडू यांनी बुधवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर या प्रकरणी आयोगाच्या निर्णयावर हल्ला चढवला.

आता निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरण्यात येणार नाही. त्यामुळे निवडणूक घेण्यापेक्षा भाजप कार्यालयात ठपके मारा. कारण, २-३ देश सोडले तर ईव्हीएम मशीन कुठेच वापरली जात नाही. त्यामुळे मतदान हे शाळेत न ठेवता भाजपच्या कार्यालयात ठेवण्याची मागणी करणारे पत्र निवडणूक आयोगाला पाठवणार आहे, असे बच्चू कडू म्हणाले.










# कबुतरखान्याचा वाद पेटला : जैन समाज आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६:

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दादरमधील कबुतरखाना बंद करण्यात आला होता. यावरून जैन समाजाच्या वतीने जैन मंदिरामध्ये सर्वधर्मीय सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या संदर्भात काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर आज ही सभा रद्द करण्यात आली होती. मात्र सकाळी या सभेसाठी अचानक जैन समाज आक्रमक झाला आणि त्यांनी कबुतर खाण्यावरील झाकण्यात आलेली ताडपत्री काढून टाकली. यामुळे जैन समाज बांधव आणि पोलिसांमध्ये काही काळ झटापट देखील झाली. त्यामुळे येथे तणाव देखील निर्माण झाला होता.

दादरमधील कबुतरखाना परिसरात जैन समाज अचानक आक्रमक झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जैन समाजाच्या बाजूने निर्देश दिले होते. या संदर्भात उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. मात्र, तो पर्यंत कबुतर उपाशी मरतील, असे जैन समाजाच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळे तात्काळ ताडपत्री हटवून कबुतरांना दाणा टाकण्याची मागणी या आंदोलकांनी केली.

### फडणवीसांनी दिले होते निर्देश

दादरमधील कबुतरखाना अचानक बंद करणे योग्य नाही. या संदर्भात राज्य सरकार आणि महानगरपालिकेने उच्च न्यायालयात ठाम भूमिका मांडावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले होते. कबुतरखाना अचानक बंद करणे योग्य नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते. पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कंट्रोल फीडिंग करा, तांत्रिक पद्धतीने स्वच्छता करण्याचे निर्देश देखील फडणवीस यांनी दिले होते.

## समाज बांधव आणि पोलिसांमध्ये झटापट : आमदार मनिषा कायंदेनी सुनावली खरीखोटी





### तेव्हा धर्म कुठे जातो?



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे यांनी जैन समुदायावर निशाणा साधला आहे. गुजरातच्या पतंग महोत्वात मांजाने गळा कापून पक्षी मरतात, तेव्हा तुमचा धर्म कुठे जातो? असा सवाल त्यांनी केला आहे.

आमदार मनीषा कायंदे संताप व्यक्त करताना म्हणाल्या की, मुंबईतील कबुतरखान्यांचा विषय न्यायप्रविष्ट आहे. पण त्यानंतरही कुणीही उठून कबुतराना दाणे टाकते. हे कोणत्या कायद्यात बसते? कालही अनेकांनी फुटपाथवर ५ किलो धान्य टाकले. किराणा दुकानातून दाणे घ्यायचे आणि ते रस्त्यावर टाकायचे. लोकांना चालण्यासाठीचे फुटपाथ यासाठी तयार करण्यात आलेत का? दादर कबुतरखान्याबाहेर जैन समाजाने केलेले आंदोलन टोकाचे व अतिरेकी विचाराचे आहे. अशा प्रकारचा उद्रेक कोणत्या कायद्यात बसतो?

त्या पुढे म्हणाल्या, जैन समाजाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धर्मसंकटात टाकले आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मुंबईतील ५१ ठिकाणी कबुतरखाने कुणी सुरू केले? हायकोर्टाच्या आदेशातील पान क्रमांवर ६ वर नमूद आहे की, या जागा पूर्वी पाणपोईसाठी वापरण्यात येत होत्या. पण लोकांनी तिकडे दाणे टाकून त्याचे कबुतरखाने तयार केले.

गुजरातमध्ये पतंग महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्या महोत्वात अनेक पक्षी मांजाने गळा कापून मरून पडतात. पक्षांचे हात-पाय कापले जातात. तिकडे रुग्णवाहिका उभ्या असतात. तेव्हा त्यांच्या धर्माचा विषय येत नाही का?

कबुतरांमुळे होणारा त्रास हा वैज्ञानिक विषय आहे. त्यात कुणीही धर्म आणण्याचा प्रयत्न करू नये. कबुतरे फक्त दाणे खात नाहीत. ते कीटकही खातात. आत्ता हे लोक निवडणुकीत नोटाचे बटण दाबून धडा शिकवण्याची भाषा करत आहेत. जैन धर्मात असे कुठे लिहिले आहे?

**कबुतरांना पंख दिलेत, ते त्यांचे अन्न शोधतील**

मनीषा कायंदे म्हणाल्या, कबुतरांना दाणे टाकायचे असतील तर स्वतःच्या इमारतीच्या टेरेसवर टाका. त्यांच्या विष्ठेतून निर्माण होणाऱ्या फंगसमुळे लोकांचा मृत्यू होत आहे. त्यांच्या मृत्यूला कोण जबाबदार? याविषयी या आंदोलन करणाऱ्यांचे काय म्हणणे आहे?

त्यामुळे जैन समुदायाने आपला अतिरेकीपणा थांबवावा. देवाने कबुतरांना पंख दिलेत. ते त्यांचे अन्न शोधतात. तुम्ही त्यांना सवय लावली आहे. तुम्ही दाणे टाकता, म्हणून ते तिथे येतात. तुम्ही अन्य ठिकाणी धान्य टाका, कबुतर आपोआप तिकडे येतील. त्यांना सवय लागेल. मी प्राणीशास्त्रात पीएचडी केली आहे. या प्रकरणी तुम्हाला प्राणी तज्ज्ञांशीही मदत घेता येईल. जैन धर्मातही अनेक डॉक्टर्स आहेत, असेही मनीषा कायंदे यावेळी बोलताना म्हणाल्या.

# कबुतरखाना आंदोलनावर मंत्री लोढा यांचा वेगळाच दावा

कबुतरखाना परिसरात जे झाले ते चुकीचे झाले असल्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी म्हटले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दादरमधील कबुतरखाना बंद करण्यात आला होता. जैन समाज बांधव आक्रमक झाले. मंगल प्रभात लोढा यांनी मध्यस्थी करत वाद शांत करण्याचा प्रयत्न केला.

जैन समाजाने केलेल्या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना मंगल प्रभात लोढा म्हणाले, आज कबुतरखाना परिसरात जे झाले ते चुकीचे झाले. कायदा हातात घेऊ नका. मुंबईकरांनी शांतता राखावी. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य त्या सूचना दिल्या आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच मुख्यमंत्र्यांनी पर्यायी उपाययोजना राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले असल्याची माहिती देखील लोढा यांनी दिली आहे.



मंगल प्रभात लोढा यांनी घटनास्थळी जाऊन पोलिस अधिकारी तसेच ट्रस्टशी संवाद साधला. ट्रस्टच्या म्हणण्यानुसार या आंदोलनात बाहेरचे लोक आले होते. त्यांनी हे सगळे केले आहे, आमचा यात संबंध नाही. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्णयाचे जैन समाजाच्या ट्रस्टने समाधान मानले होते तसेच त्यांची सभा देखील पुढे ढकलली होती, असे लोढा यांनी म्हटले आहे.

### किशोरी पेडणेकरांचा सरकारवर निशाणा

मुंबईच्या माजी महापौर व शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. पेडणेकर म्हणाल्या, याबाबत सरकार बॅकफूटवर का जात आहे? कबुतराच्या विष्ठेमुळे दमा चालू होतो किंवा कोणते आजार होतात हे नक्की बरोबर आहे, आणि सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्यानुसार सुप्रीम कोटार्चा अपमान होणार नाही अशा पद्धतीने पहिल्यांदा पर्यायी जागा देऊन त्यांना शिफ्ट करणे गरजेचे होते.

पेडणेकर म्हणाल्या, जवळपास ९३ वर्षांचा कबूतरखाना आहे, काल परवाच्या झोपडपट्टीला जर आपण संरक्षण देतो, तर यालाही संरक्षण दिले पाहिजे. फक्त मनुष्यवस्तीपासून त्याला लांब नेता येईल का? त्यांचा दाणापाणी थांबून चालणार नाही, ज्या क्रूर पद्धतीने सर्व काही झाले, त्याबाबतीत जैन समाज अगदीच हळवा झाला आहे. समाजा-समाजामध्ये अशा तेढ निर्माण होतील. त्याबाबतीत पर्याय व्यवस्था द्या. त्यांचा जीव वाचवा. त्यांनाही पर्याय व्यवस्था देऊन दानापाणी द्या असे पेडणेकर यावेळी म्हणाल्या.

# भाजपच्या प्रवक्त्या आरती साठे उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश





**मुंबई :** सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणे म्हणजे लोकशाहीवर केलेला सर्वांत मोठा आघात असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. दोन वर्षांपूर्वी भाजपच्या प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. यावरून रोहित पवारांनी हल्लाबोल केला आहे.

आमदार रोहित पवारांनी ट्विट करत म्हटले की, याचा भारतीय न्याय व्यवस्थेच्या निःपक्षपणावर दूरगामी परिणाम होईल. केवळ न्यायाधीश होण्याची पात्रता आहे म्हणून थेट राजकीय व्यक्तींना न्यायाधीश नेमणे म्हणजे न्यायपालिकेला राजकीय आखाडा बनवण्याचा प्रकार नाही का? असा सवाल पवारांनी उपस्थित केला.

पुढे रोहित पवार म्हणतात, सत्तेवर कुणाचा अंकुश निर्माण होऊन सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये तसेच चेक अँड बॅलन्स राहावा यासाठी संविधानात सेपरेशन ऑफ पॉवरचे तत्व अवलंबले आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे सेपरेशन ऑफ पॉवरच्या तत्त्वाला आणि संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? जेंव्हा उच्च न्यायालयातील न्यायाधीश पदावरील व्यक्ती राजकीय पार्श्वभूमी आणि सत्ताधारी पक्षातील पदाचा उपभोग घेतलेली असेल तेंव्हा न्यायदानाची प्रक्रिया राजकीय आकस बाळगून होणार नाही, याची खात्री कोण देणार? एका राजकीय व्यक्तीच्या नियुक्तीने पुर्ण न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का? असा प्रश्न रोहित पवारांनी उपस्थित केला आहे.

**भाजपचा पलटवार**

या प्रकरणावरून भाजपनेही पलटवार केला आहे. त्यासाठी भाजपने बहरूल इस्लाम यांचे उदाहरण दिले आहे. या संदर्भात भाजपने नेते केशव उपाध्ये यांनी एका पोस्टच्या माध्यमातून काँग्रेस आणि शरद पवार यांच्या पक्षावर टीका केली आहे. त्यांनी आधी इतिहास पहावा, असे सांगत त्यांनी आधी काँग्रेसचे राज्यसभा सदस्य नंतर न्यायमूर्ती आणि पुन्हा काँग्रेसचे राज्यसभा सदस्य बनलेले बहरूल इस्लाम यांचे उदाहरण देखील दिले आहे.

# कांदळवन नुकसान प्रकरणी तत्काळ कार्यवाही करावी

**मुंबई :** अलिबाग परिसरात काही कंपन्यांकडून होणारे कांदळवनाचे नुकसान व अनधिकृत बांधकामांच्या प्रकरणांची संबंधित विभाग व यंत्रणांनी गांभीर्याने नोंद घेऊन त्यासंदर्भात तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. विधानभवन येथील दालनात यासंदर्भात बैठक झाली. यावेळी आमदार सुनिल प्रभू व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पर्यावरण, वन विभागाच्या कायद्यांचे उल्लंघन करुन अनधिकृत बांधकाम व कांदळवनांचे नुकसान करणाऱ्या संबंधित कंपन्यांसंदर्भात गांभीयार्ने दखल घेण्यात आली असून संबंधित विभाग व यंत्रणांनी यासंदर्भात तत्काळ कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देशही विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांनी दिले.

# बनावट इनपुट टॅक्स क्रेडिटचा गैरवापर व करचोरी

**मुंबई :** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागाने विनय राजेश पारेख (वय ३७) रा. ए-४०२, कुंज पॅराडाईस, आयआयसीआय बँकेच्या समोर, बडोदा, गुजरात याला २९.८८ कोटी रुपये इतक्या किंमतीचा बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) घेऊन करचोरी केल्याप्रकरणी अटक केली आहे.

सदर अटक मेसर्स ॲन्जल प्लाय ॲन्ड लॅम या फर्म मध्ये करण्यात येत असलेल्या पुढील तपासाचा एक भाग आहे. विभागाने अशा करचोरी करणाऱ्या करदात्यांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे, जे वस्तू किंवा सेवा प्रत्यक्ष न पुरवता बनावट बिले तयार करून आयटीसीचा अवैध लाभ घेत आहेत. ह जीएसटी कर अधिनियम २०१७ अंतर्गत गंभीर स्वरूपाचे उल्लंघन आहे.

विनय राजेश पारेख हे मेसर्स ॲन्जल प्लाय ॲन्ड लॅम या फर्मचे प्रोप्रायटर असून या फर्ममार्फत सुमारे २९.८८ कोटींची बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट घेतला असून आरोपी विनय राजेश पारेख याला अटक करून मा. न्यायदंडाधिकारी एस्प्लेनेड कोर्ट यांच्यासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यास १८ ऑगस्ट २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

सदर कारवाई ही सहाय्यक राज्यकर आयुक्त (डी-३१३) नितीनचंद्र ग. पाटील व सहाय्यक राज्यकर आयुक्त (डी-३१५) रमेश उ. अवघडे यांच्या नेतृत्वाखाली, डीसी-ई-०३०३ यूनिटच्या राज्यकर निरीक्षकांसह पार पाडण्यात आली. महाराष्ट्र जीएसटी विभागाने बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याचा निर्धार पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

# महापौरपदासाठी रस्सीखेच

## भाजप - शिंदेसेनेत संघर्षाची ठिणगी?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६:

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीचे पडघम वाजू लागले असतानाच, शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप या दोन्ही मित्रपक्षांमध्ये महापौरपदावरून जोरदार जुगलबंदी सुरू झाल्याचे दिसत आहे. दोन्ही पक्षांचे नेते आपापल्या उमेदवाराला महापौर पदासाठी पुढे करत असल्याने आगामी निवडणुकीत युतीमध्ये बिघाडी होण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात, कल्याण-डोंबिवलीला विकासाचे ग्रहण लागले आहे, ते दूर करण्यासाठी भाजपचा महापौर होणे अत्यंत गरजेचे आहे, असे सांगत कार्यकर्त्यांना स्वबळावर लढण्याचे आणि कल्याण-डोंबिवली भाजपमय करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या वक्तव्याला भाजप आमदार किसन कथोरे यांनीही दुजोरा दिला आहे. अध्यक्षांनी सांगितलेल्या मार्गानेच आम्हाला चालावे लागेल आणि कल्याण-डोंबिवलीच्या विकासासाठी भाजपचाच महापौर हवा असा ठाम निर्धार किसन कथोरे यांनी व्यक्त केला आहे.

**स्वबळावर लढण्यासाठी सक्षम**

भाजपच्या या विधानानंतर शिंदे गट देखील आक्रमक झाला आहे यावर, शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. गेल्या २५ वर्षांपासून कल्याणमध्ये शिवसेनेचा भगवा फडकत आहे. ठाणे जिल्हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि शिवसेना हा मोठा पक्ष आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही स्वबळावर लढण्यासाठी पूर्णपणे सक्षम आहोत, असे सांगत अरविंद मोरे यांनी महापौर शिवसेनेचाच होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे यांच्या विकास कामांमुळे जनतेच्या मनात शिवसेनेबद्दलचे महत्त्व वाढले आहे. युती झाली तर भाजप कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ शकतो, त्यामुळे मैत्रीपूर्ण लढत देखील होऊ शकतात, असे म्हणत स्वबळाच्या शक्यतेला अरविंद मोरे यांनी बळ दिले आहे.

या विरोधात शिंदे गटाचे शहरप्रमुख रवी पाटील यांनी मात्र सावध भूमिका घेतली. महायुती आहे आणि प्रत्येक पक्ष आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करतो. आम्ही शिवसेनेचा महापौर व्हावा यासाठी प्रयत्न करू, पण अंतिम निर्णय वरिष्ठ नेते घेतील, असे रवी पाटील म्हणाले.

या सर्व घडामोडींवरून, आगामी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही मित्रपक्ष महापौरपदासाठी एकमेकांसमोर उभे ठाकल्यास आश्चर्य वाटायला नको. दोन्ही पक्षांकडून सुरू असलेली ही राजकारणाची खेळी येत्या काही महिन्यांत आणखी कोणत्या दिशेने जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# माजी आमदार दादांच्या राष्ट्रवादीत : शरद पवारांना जबर धक्का

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६:

गेल्या काही दिवसांपासून अनेक नेते पक्षांतर करत आहेत. अशातच आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला आहे.

शरद पवार गटाचे भूम-परांडा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राहुल मोटे यांनी आज आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.



अजित पवार यांनी राहुल मोटे यांचे स्वागत केले. यावेळी अजित पवार म्हणाले की, सत्तेच्या विरोधात जाऊन विकासकामे होत नसतात तर सत्तेत राहून जनतेची कामे होत असतात. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. त्यादृष्टीने कामाला लागा. भेदभाव न करता आपल्या पक्षाला कसे यश मिळेल याकडे लक्ष द्या. चुकीच्या पद्धतीने केलेल्या कामामुळे पक्षाला फटका बसू शकतो.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की, स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांनी आपल्याला बेरजेचे राजकारण शिकवले आणि ते आपण करतोय. जातीभेद, धर्म, पंथ न बाळगता एकत्र नांदण्याचा प्रयत्न करत आहोत. जातीय सलोखा राखण्याची जबाबदारी आपली असली पाहिजे. लोकांचे प्रश्न त्यांच्यात मिसळून सोडवले गेले पाहिजे असे आवाहनही अजित पवार यांनी केले आहे.

पक्षाच्या वाढीसाठी नवीन कार्यकर्त्यांची उभारणी करायची आहे. त्यांच्या सहकार्यानेच पक्षाची बांधणी करायची आहे. पक्षाची स्थापना अशाच ज्येष्ठ लोकांच्या आशिर्वादाने झाली आणि आज पक्ष २६ वर्षांचा झाला असल्याचे अजित पवार यावेळी म्हणाले.

### वैद्यकीय विद्यार्थिनीची आत्महत्या

**पुणे :** शहरातील नामांकित बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या २३ वर्षीय तरुणीने रात्री वसतिगृहातील एका रिकाम्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आलेली आहे.

ज्योती कृष्णकुमार मीना असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. ज्योती मीना ही मूळची राजस्थान येथील रहिवासी असून ती बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. ती कॉलेजच्या वसतिगृहात राहत होती. हॉस्टेल मधील तिच्या खोली समोरील एका मोकळ्या खोलीत तिने गळफास घेतला असल्याचे उघडकीस आले आहे. घटनेची माहिती मिळताच बंड गार्डन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आत्महत्येपूर्वी लिहिलेली एक चिठ्ठी सापडली असून, त्यातून ती नैराश्यात होती, हे प्राथमिक तपासातून समोर आले आहे.

# मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्समध्ये अतिरिक्त शोज मिळवून देण्यासाठी समिती



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६:

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा**

मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्स मध्ये अतिरिक्त शोज मिळवून देण्यासह या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासन स्तरावर समिती स्थापन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. समितीने दीड महिन्यात शासनाला अहवाल सादर करावा, मराठी सिनेमा जगला पाहिजे अशी राज्य शासनाची भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मराठी सिनेमांना मल्टिप्लेक्स मध्ये मिळणाऱ्या कमी स्क्रीन, तसेच त्यांना कोणतीही माहिती न देता तीन दिवसात सिनेमा थिएटरमधून उतरवणे, आठवड्याभराचे शुल्क घेऊन उर्वरित रक्कम परत न करणे, तसेच सेन्सॉर बोर्डाकडून मराठी सिनेमांना सेन्सॉर संमती, मराठी सिनेमाच्या खेळांच्या वेळा ऐनवेळी बदलणे अथवा रद्द करणे यासारख्या अनेक प्रश्नांबाबत मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक आणि विविध पक्षांच्या सिने कर्मचारी संघटनांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने मंत्रालयात बैठक झाली.

यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, गृहराज्यमंत्री योगेश कदम, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, नगरविकास प्रधान सचिव डी. गोविंदराज, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, मनसे चित्रपट सेनेचे अमेय खोपकर, शिवसेना चित्रपट सेनेचे सुशांत शेलार, राष्ट्रवादी चित्रपट सेनेचे बाबासाहेब पाटील, नानूभाई जयसिंघानी, वितरक समीर दीक्षित, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, संदीप घुगे हेदेखील उपस्थित होते.

शिंदे यांनी निर्माते, वितरक, मल्टीप्लेक्स मालक यांचे म्हणणे जाणून घेतले. मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असून मराठी सिनेनिर्माता जगला तरच मराठी सिनेमाला चांगले दिवस येणार आहेत. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले.

या समितीचे अध्यक्ष गृह विभागाचे अपर मुख्य सचिव असून विविध विभागाचे सचिव, मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक, मल्टिप्लेक्स मालक, फिल्मसिटी अधिकारी, चित्रपट महामंडळाचे प्रतिनिधी, निमार्ते महामंडळाचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. समिती येत्या दीड महिन्यात आपला अहवाल सादर करणार आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या उपकेंद्रांच्या धोरणाबाबत

# सुधारित आराखडा तयार करावा : पाटील

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत उपकेंद्राकरिता सार्वजनिक विद्यापीठात प्रत्येक ठिकाणी पाच एकर जागा देण्यासंबंधी केलेली कार्यवाही तसेच ज्या ठिकाणी उपकेंद्राकरिता जागा मिळाली आहे त्याचे भाडे किंवा तत्सम धोरणासंबंधीचा सुधारित आराखडा तयार करावा, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.



मंत्रालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या विविध प्रश्नांबाबत आयोजित आढावा बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील बोलत होते.

या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ.विनोद मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक डॉ. प्रमोद नाईक, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, सहसचिव संतोष खोरगडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या अधिष्ठाता, संचालक व सहसंचालक पदाची बिंदुनामावली तपासणी आणि शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध व पदभरती याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात साबांवि अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासंदर्भात सूचना देऊन प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाकरिता शासनामार्फत दोन विशेष कार्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठातील पायभूत सोयीसुविधांकरिता भरीव निधी शासनामार्फत उपलब्ध करण्यात आल्याचेही ते म्हणाले.

## अकोल्यात कोट्यावधींची फसवणूक एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अकोला :** शहरातील एका मेडिकल प्रतिनिधीची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरातील 'द अशोक फार्मा' या होलसेल औषध विक्री दुकानाच्या मालकांनी चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून तक्रारदाराकडून लाखोंची गुंतवणूक करून घेतली. त्यानंतर पैसे परत करण्यास टाळाटाळ केली, धमक्या दिल्या आणि शहर सोडून पळून गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी रामदासपेठ पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकोला येथील आतिश प्रमोदबिडवे (वय ४३) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, ते मेडिकल प्रतिनिधी असून, त्यांचे दवा बाजारात नेहमी करण्यास सुरुवात केली. जेव्हा बिडवे यांनी वारंवार पैशांची मागणी केली, तेव्हा त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. आरोपींपैकी एकाने त्याच्या आई–वडिलांचा अहमदाबादमध्ये विमान अपघातात मृत्यू झाल्याचे कारण सांगून पैसे देण्यास नकार दिला. या प्रकरणी बिडवे यांनी ३१ जुलै २०२५ रोजी आरोपींना जवाहर नगरमधील एका मंगल कार्यालयाजवळ भेटण्यास बोलावले. त्यावेळी आरोपींनी बिडवे यांना धमकावलेकी, 'माझे गुंडांसोबत संबंध आहेत, तुमच्यावर आरोप करून तुम्हाला अटक करू शकतो.' तसेच, त्यांनी बिडवे यांचा चेक घेऊन जाण्यास सांगितले आणि जीव मारण्याची धमकीही दिली. त्यानंतर आरोपींनी त्यांचे घर आणि फ्लॅट विकून मुलांच्या शाळांचे टी. सी. काढून अकोला सोडून पलायन केले.

## शहरातील बेशिस्त ऑटो रिक्षा चालविणारे १०४ ऑटो रिक्षा जप्त

■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :

शहर वाहतुक शाखे मार्फत शहरातील बेशिस्त ऑटो रिक्षा चालविणारे १०४ ऑटो रिक्षा जप्त करून कार्यवाही करण्यात आली.अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री. अर्चित चांडक साहेब यांचे आदेशानुसार पोलीस निरीक्षक मनोज बहुरे यांनी शहर वाहतुक नियंत्रण शाखे मार्फत शहरातील बेशिस्त ऑटो रिक्षा चालक यांचेवर मोटार वाहन कायदया प्रमाणे कार्यवाही करण्याकरीता अकोला शहरात दिनांक ०६/०८/२०२५ रोजी विशेष मोहीम राबवुन कारवाई केली.सदर विशेष मोहीम दरम्यान शहर वाहतुक नियंत्रण शाखे मधील ०३ पोलीस अधिकारी व २४ अमंलदार यांनी बसस्थानक चौक, रेल्वेस्टेशन चौक, गांधीचौक व शहरातील मुख्य चौकामध्ये वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे ऑटो रिक्षा चालकांवर मोटार वाहन कायदयान्वये विविध नियमांची उल्लंघन करणारे १०४ ॲटो वाहतुक नियंत्रण शाखा, कार्यालय येथे जप्त करून दंडात्मक कार्यावाही करून त्यांना वाहतुक नियमांची जाणीव करून देवुन व वाहतुक नियमा संबंधी समुपदेशन मार्गदर्शन केले.

तरी वाहतुक शाखे मार्फत आवाहन करण्यात येत आहे की, ऑटो रिक्षा चालक यांनी रिक्षा चालवितांना ऑटो स्टॅन्डचा वापर करावा रस्त्यावर ऑटो उभे करू नये, वाहतुक नियमांचे उल्लंघन करू नये, तसेच ऑटो चालवितांना सोबत वाहनांचे कागदपत्रे बाळगावे, गणवेश परीधान करावे, क्षमतेपेक्षा जास्त शाळकरी मुलांची वाहतुक करू नये, परवान्या पेक्षा जास्त प्रवासी वाहतुक करू नये व वाहतुक नियमांचे तंतोतंत पालन करावे व आपले वाहनावर पेंडीग दंड ठेवु नये असल्यास त्वरीत वाहतुक पोलीस किंवा शहर वाहतुक कार्यालय येथे दंड भरावे .





## रक्षाबंधन नि:स्वार्थ प्रेम,एकता आणि पवित्रतेचा उत्सव: बीके रुख्मिणी दीदीजी

■तेल्हारा,दि ६ (प्रतिनिधी) :

प्रजापीता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय तेल्हारा येथे ३ ऑगस्ट च्या सायंकाळी संचालिका ब्रह्माकुमारी प्रमिला दीदी यांच्या मार्गदर्शखाली रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला. अकोला–वाशीम ब्रम्हाकुमारीज प्रमुख राजयोगी ब्रह्माकुमारी रुख्मिणी दीदीजी व ब्रह्माकुमारी सुमन दीदीजी यांच्या उपस्थितीत रक्षाबंधन उत्सव साजरा करण्यात आला.



रुख्मिणी दीदींनी उपस्थित भाऊ बहिणींना रक्षाबंधनाचे आध्यत्मिक महत्व व रहस्य सांगितले. रक्षाबंधन हा निः स्वार्थ प्रेम, एकता, पवित्रता आणि परिवर्तन याची स्मुर्ती व साक्ष देणारा भारतातील मोठा उत्सव आहे. बहिणीने भावाला रक्षा सुत बांधून पवित्र नात्याला व विश्वासाला जोपसण्याचे अभिवचन दिले जाते. तसेच आत्मिक स्वरूपाने विचार केल्यास सृष्टीतील सर्व मनुष्य एकाच परमात्म्याची मुलं आहेत त्यामुळे भाऊ भाऊ आणि बहीण भाऊ या नात्याने त्यांना एकाच विचाराने बांधून ठेवण्याचे श्रेष्ठ कार्य रक्षाबंधन निमित्त केले जाते.

राखी बांधण्यापूर्वी स्मुर्ती चा तिलक लावून आपण देविदेवता असल्याची स्मुर्ती दिली जाते आणि त्यादिशेने परिवर्तन होण्यासाठी ब्रह्माकुमारीज राजयोग प्रत्येक मनुष्याला समजवीण्याची सेवा करीत आहे.ब्रह्माकुमारीज परिवार हा समाज उन्नतीसाठी प्रेरक असून आपण तशी स्मुर्ती ठेवावी असे मनोगत रुख्मिणी दीदींनी व्यक्त केले.ब्रह्मा कुमारीज मुख्यालय माउंट अबू राजस्थान म्हणजे मधुबन वरून सर्वांसाठी आलेली राखी प्रदर्शित करून ईश्वरीय संदेशाचे वाचन केले.संचालिका प्रमिला दीदींनी स्मुर्ती तिलक लावून आदरणीय रुख्मिणी दीदींच्या हस्ते सर्वाना राखी बांधून सुमन दीदींच्या हस्ते टोली वाटण्यात आली. प्रसंगी तेल्हारा सेवा केंद्र व गीता पाठशाळेचे भाऊ बहिणी मोठया संख्येने उपस्थित होते.

### बार्शीटाकळीतील खोलेश्वर मंदिरात 'द ग्रेट मराठा मित्र मंडळा'च्या आयोजनात

## जलाभिषेक, लहानग्यांचा भावनिक सहभाग ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

■बार्शिटाकळी,दि ६ (प्रतिनिधी) :

बार्शीटाकळीतील ऐतिहासिक खोलेश्वर मंदिरात यावर्षी पार पडलेली 'द ग्रेट मराठा मित्र मंडळा' आयोजित भव्य कावड यात्रा २०२५ ही केवळ एक धार्मिक परंपरा नव्हे, तर सामाजिक जागृतीचेही प्रतीक ठरली. हजारो भाविकांच्या उपस्थितीत भक्तिभावाने पार पडलेल्या या यात्रेने संपूर्ण शहरात एक वेगळेच भक्तिमय वातावरण निर्माण केले.यात्रेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौकात पारंपरिक दहीहंडी उत्सवाने करण्यात आली. शिवगर्जना, ढोल पथकांचे निनाद, आणि वारकरी संप्रदायाचा सहभाग यामुळे यात्रेला अधिक तेजस्वी आणि ऊर्जा देणारा आरंभ झाला.कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन अत्यंत शिस्तबद्धरीत्या पार पडले. २००० ते ३००० भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शांततेत आणि अनुशासनात पार पडलेला हा उपक्रम अकोला जिल्ह्यात आदर्श ठरला आहे.विशेष म्हणजे यात्रेदरम्यान सादर करण्यात आलेल्या 'बेटी बचाव, बेटी पढाव' आणि



'झाडे लावा, झाडे जगवा' या विषयांवर आधारित पथनाट्यांनी सामाजिक संदेश पोहचवण्याचे कार्य यशस्वीरित्या पार पाडले.यावर्षीच्या यात्रेतील सर्वात भावस्पर्शी आणि प्रेरणादायी पैलू म्हणजे लहान चिमुकल्यांचा शिस्तबद्ध सहभाग होता.

## उत्तराखंड दुर्घटनेत अडकलेल्यांबाबत माहिती देण्याचे आवाहन

■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :

उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील थराली येथे दि. ५ ऑगस्ट रोजी भूस्खलन होऊन मोठे नुकसान झाले. अकोला जिल्ह्यातील कुणाचे नातेवाईक, परिचित, पर्यटक या परिसरात गेले असतील तर तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा तहसील कार्यालयात माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.जिल्हा नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक (०७२४) २४२४४४४ किंवा पोलीस नियंत्रण कक्षाला (०७२४) २४४५३३३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आलेगांव येथे अवैध गावठी दारूवर धाड;मुद्देमाल जप्त

■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :

मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे.अकोला जिल्ह्यातील चानी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या आलेगांव मध्ये खुलेआम दारू वरळी मटका सुरु आहे.

गावात या मुळे भांडण होतात खूप घर बरबाद झाले आहेत. अशी तक्रार पोलीस अधीक्षक यांना प्राप्त झाली होती प्राप्त तक्रारी वरून पोलीस अधीक्षकांनी, पोलीस निरीक्षक श्री शंकर शेळके स्थानिक गुन्हे शाखा यांना दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करण्यात आले. आज दि. ०६/०८/२०२५ रोजी पथकासह शासकीय वाहनाने पो स्टे. चान्नी हद्दीतील ग्राम आलेगाव येथील डुक्करधरा नाला येथे



पंचासमक्ष गावठी हातभट्टी दारू रेड केली असता, आरोपी नामे देवदास सुखदेव तेलगोटे वय ४९ रा. आलेगाव ता. पातूर जि अकोला हा गावठी हातभट्टी दारू गळताना मिळून आला त्याचे ताब्यातून गावठी दारू ५० लिटर प्रति लिटर २००/– रू. प्रमाणे १००००/– रू व ४७ लोखंडी पिप्यामध्ये ७०५ लिटर मोहा सळवा किंमत ७०५००/– रू असा एकूण ८०५००/– रू चा मुद्देमाल आरोपी कडून जप्त करण्यात आला आहे सदर आरोपी विरुद्ध पो स्टे. चान्नी येथे करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### मनपा उपायुक्त या पदाचा कार्यभार विजय पारतवार यांचेकडे



**अकोला :** अकोला महानगरपालिकेचे महसुली उत्पन्नाचे स्त्रोत निर्मिती करणे, वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करणे, महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून महसूल उत्पन्न वाढ विण्याकरीता प्रभाववीपणे उपाययोजना करून त्यांची उंमल बजावणी करणे, महानगरपालिका अंतर्गत असलेल्या विविध विभागाचे दैनंदिन काम काजामध्ये सुसुत्रता, पारदर्शकता व गतिशीलता आणण्याकरिता, या विभागांतर्गत लोकाभिमुक सेवांची अंमलबजावणी तातडीने व्हावी याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये कर अधिक्षक विजय पारतवार यांचेकडे उपायुक्त (विकास) या पदाचा कार्यभार सोपविण्यात आले असून त्यांचे कडे शिक्षण विभाग, जन्म–मृत्यु व विवाह नोंदणी विभाग, वैद्यकीय आरोग्य व मलेरिया विभाग, मध्यवर्ती भांडार विभाग, पर्यावरण संवर्धन व उद्यान विभाग, समाज कल्याण व विकास विभाग, दीनदयाल अंत्योदय योजना, अभिलेखा विभाग, संगणक/माहिती तंत्रज्ञान (IT), अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन बाबात कार्यवाही करणे, या विभागाची प्रशासकीय जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### नेहरू हॉकी कप स्पर्धेत जी. एस. शाळा अव्वल

**अकोला :** जिल्हा नेहरू हॉकी कप स्पर्धेत जी. एस. कॉन्व्हेंटने प्रथम क्रमांक पटकावला.जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अकोला व हॉकी अकोला असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय नेहरू हॉकी कप स्पर्धे चे आयोजन स्थानी पोलीस ट्रेनिंग सेंटर गडंकी येथे करण्यात आले.या आयोजनासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला चे प्राचार्य पांडे यांनी सहकार्य केले. जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट, सुरज दुबे, मनीषा ठाकरे आदी उपस्थित होते. स्पर्धेचे प्रास्ताविक राजू डोंगरे सर तर आभार प्रदर्शन राजू उगवेकर सर यांनी केले स्पर्धे चे निकाल खालील प्रमाणे.१५ वर्षे मुलेजी एस कॉन्व्हेंट अकोला,स्कूल ऑफ स्कॉलर बिर्ला, स्कूल ऑफ स्कॉलर हिंगणा १७ वर्षे मुले.

## नवोदय विद्यालयात कला महोत्सवाचा शुभारंभ



■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :

जवाहर नवोदय विद्यालय बाभुळगाव, अकोला येथे आज रंगलेल्या कला महोत्सव कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये कलात्मकतेचा नवा उत्साह जागृत केला. या कार्यक्रमात नवोदय विद्यालय समिती,पुणे विभागातील अमरावती संकुलातील १८ नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला, विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या सांस्कृतिक आणि कलात्मक सादरीकरणांद्वारे आपली कला सादर केली.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. या महोत्सवामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून श्री. प्रा.प्रशांत गावंडे जे. आर.डी. टाटा शाळेचे संस्थापक व स्पर्धचे परीक्षक म्हणून प्रा.श्री देवेंद्र देशमुख ,प्रा.श्री शुभम नारे ,प्रा.श्रीमती रागिनी खोडवे, उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे कौतुक करताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळते नंतर विद्यार्थ्यांनी गायन, वादन, नृत्य, नाट्य, चित्रकला, हस्तकला इत्यादी स्पर्धांमध्ये भाग घेतला. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य दाखवले आणि प्रेक्षकांची मने जिंकली.सदर कार्यक्रम हा दिनांक ०६/०८/२०२५ व ०७/०८/२०२५ दोन दिवस सुरू राहील.कार्यक्रमाचे आयोजन जवाहर नवोदय विद्यालय अकोला चे प्राचार्या श्रीमती. कविता चव्हाण, उप प्राचार्य श्री.ज्ञानेश्वर तायडे सर, व कला विभाग प्रमुख श्री.राजेश सोनटक्के सर आणि संगीत विभाग प्रमुख श्री. नेवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## विद्यार्थ्यांकडून वणी–रंभापूर येथे फवारणी सुरक्षिततेबाबत जनजागृती

### कृषी महाविद्यालय,अकोलाचा उपक्रम!

■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :

कृषि शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थांना महाविद्यालयीन शिक्षणाची कृतियुक्त जोड मिळण्याचे हेतूने ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत एका हंगामासाठी प्रत्यक्ष शेतकरी बांधवाचे शेतावर जात दैनंदिन अभ्यास नोंदी घ्याव्या लागतात तथा विद्यापीठ संशोधित आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतकरी बांधवांची प्रचलित पद्धतीची सांगड घालत शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार–प्रसार साध्य होते.याचं उपक्रमा अंतर्गत कृषी महाविद्यालय, अकोला येथील ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम (रावे) २०२५ च्या



सहभागी विद्यार्थ्यांनी दिनांक ४ ऑगस्ट रोजी वणी–रंभापूर या गावातील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण जनजागृती उपक्रम राबवला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी कीडनाशकांची फवारणी करताना घ्यावयाच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना तसेच सेफ्टी किटच्या वापराबाबत सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी शेतकऱ्यांना विषारी रसायनांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षा साधनांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना योजनेसाठी जमीन खरेदी करणार

### प्रस्ताव पाठविण्याचे शेतमालकांना आवाहन

■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेच्या अनुषंगाने शेतजमीन खरेदी करण्यात येणार आहे. त्यासाटी इच्छूक शेतमालकांनी प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन जिल्हा समाजकल्याण सहायक आयुक्त एम. जी. वाठ यांनी केले आहे. सन २०२५–२६ करिता ज्या शेतमालकांना आपल्या स्वत:च्या वैयक्तिक मालकीची शेतजमिन या योजनेअंतर्गत विक्री करावयाची आहे, अशा शेतमालकांनी आपल्या शेतजमीन विक्रीसंबंधी प्रस्ताव समाजकल्याण कार्यालयात सादर करावेत. ई–क्लास, गावठाण जमीन, शासकीय जमीनीस ही योजना लागू नाही. शेत जमीनीवर कोणताही बोजा नसावा. याबाबत अद्ययावत सातबारा व सद्य मूल्यांकनासह प्रथम कार्यालयात संपर्क साधावा व विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयातुन मिळवावा. त्याला आवश्यक सर्व कागदपत्रे जोडून नंतर जमीन विक्रीचा प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन श्री. वाठ यांनी केले.जमीन विक्रीच्या दरास जिल्हास्तरीय समितीमार्फत मंजुरी देण्यात येईल व त्यानुसार जमिनीचे दर निश्चित होतील. असे आवाहन सहाय्यक आयुक्त एम.जी.वाठ यांनी केले आहे.

## महावितरणचे टीओडी मीटर पोस्टपेड,अचूक आणि मोफत

### ग्राहकांच्या वीजबिलांच्या तक्रारी कमी होणार

■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :

ग्राहकांना अचूक व वेळेत वीजबिल देण्यास उपयुक्त ठरणारे अत्याधुनिक टीओडी वीजमीटर राज्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणे अकोला परिमंडळाअंतर्गत अकोला,बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यातही बसविण्यात येत आहेत. हे मीटर नवतंत्रज्ञानावर आधारित असून तांत्रिकदृष्ट्या ते अधिक स्मार्ट स्वरूपाचे असले तरी ते प्री–पेड नसून, पोस्टपेड आहेत.

पूर्वीप्रमाणेच वीज वापरानंतरच ग्राहकांना वीजबिले मिळणार आहेत. हे मीटर मोफत बसवण्यात येत असून, ग्राहकांना कुठलाही आर्थिक भुर्दंड बसणार नसल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. प्रगतशील तंत्रज्ञानाचा वापर वीजक्षेत्रात होणे ही काळाची गरज आहे. टिवोडी मीटर मध्ये मानवी हस्तक्षेपाला अजिबात वाव नाही. शिवाय ऑटोमॅटिक मीटर रीडिंगमुळे ग्राहकांना अचूक व वेळेवर बिले मिळतील. त्यामुळे वीजबिलाच्या संदर्भाने होणाऱ्या ग्राहक तक्रारी कमीत कपात होणार आहे. सद्यस्थितीत कृषी वर्गवारी वगळता इतर सर्व वर्गवारीतील ग्राहकांना टीओडी मीटर बसविण्यात येत आहेत. अकोला परिमंडलात जीनस या एजन्सीला मीटर बसविण्याचे काम देण्यात आले असून सुरुवातीच्या काळात सरकारी कार्यालये, सरकारी निवासस्थाने, मोबाईल टॉवर, नादुरुस्त मीटरच्या ठिकाणी हे टीओडी मीटर बसविण्यात येत आहेत.

तसेच नवीन वीजजोडणी देतानाही टीओडी मीटर बसविण्यात येत असून, सोलार नेट मिटरिंगसाठीही त्याचा वापर करण्यात आला आहे. आतापर्यंत अकोला परिमंडळात १ लाख ३ हजार ४०२ मीटर बसविण्यात आले असून त्यापैकी अकोला ३४ हजार ८३६,बुलडा ४८ हजार ३८ आणि वाशीम जिल्ह्यात २० हजार ५२८ टीओडी मीटर बसविण्यात आले आहेत. महावितरणच्या नव्या वीजदर प्रस्तावात ग्राहकाने वीज कधी वापरली त्या वेळेनुसार दरात सवलत देण्यात येणार आहे. टीओडी मीटर असल्याशिवाय ही सवलत मिळू शकणार नाही. त्यामुळे ग्राहकांच्या दृष्टीने टीओडी मीटर आवश्यकच आहे.

नव्याने बसविण्यात येणारे वीजमीटर अत्याधुनिक व स्मार्ट स्वरुपाचे असले तरी ते प्री–पेड नाहीत किंवा ते बसविण्यासाठी व मीटरची किंमत म्हणून ग्राहकांकडून कुठलेही शुल्क आकारले जात नाही. ग्राहकाने वापरलेल्या विजेची अचूक नोंद घेऊन योग्य वीजबिल देण्यास हे मीटर उपयुक्त ठरणार आहेत. त्यामुळे वीज ग्राहकांनी टीओडी मीटर बसविण्याकामी महावितरण आणि संबंधित एजन्सीला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## मराठा पाटील संघटनेची मार्गदर्शक, समन्वयक कार्यकारिणी संयुक्त सभा संपन्न



■बाळापुर,दि ६ (प्रतिनिधी) :

मराठा पाटील संघटना नोंदणीकृत झाल्यानंतर संघटनेचे मार्गदर्शक, समन्वयक व कार्यकारणी सदस्यांची संयुक्त सभा व्याळा येथे संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक पांडुरंग पाटील यांचे अध्यक्षतेत संपन्न झाली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत राजदत्त मानकर यांच्या दुःखद निधनानंतर संघटनेचे अध्यक्षपदी कार्यकारणी सदस्य शरद वानखडे यांची एकमताने निवड करण्यात आली होती. संघटनेच्या मार्फत भय्यूजी महाराज आश्रम निमकर्दा येथे भव्य वधु वर परिचय मेळावा तसेच मराठा पाटील संघटनेच्या महिला शाखेच्या वतीने कौटुंबिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

# लाडक्या बहिणींसाठी काहीही..

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांनी मतदारांना फुकटच्या योजना व बक्षिसांची खैरात करणाऱ्या विरोधी पक्षांच्या घोषणांवर रेवडी कल्चर म्हणून टीका केली होती. मतदारांना प्रलोभने दाखवणारे रेवडी कल्चर लोकशाहीला धोक्याचे आहे असा अनेकदा इशारा दिला होता. पण निवडणुका आल्या की मतांच्या व्होट बँकेसाठी भाजपाने हाच फंदा अंगिकारायला सुरूवात केली आणि रेवडी कल्चरचा वर्षाव करायला सुरूवात केली.

-------------

मध्य प्रदेशातील भाजपा सरकारने देशात सर्वप्रथम निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर लाडकी बहिण योजना आणली व महिलांचा त्याला तुडुंब प्रतिसाद मिळाल्याने भोपाळमधे पुन्हा भाजपा सत्तेवर आली.

महिलांची मोठी व्होट बँक या योजनेच्या माध्यमातून आपल्याकडे आकर्षित करता येते हे भाजपाने बरोबर ओळखले व सत्ता काबीज करण्यासाठी लाडकी बहिण योजना हा हुकमी एक्का म्हणून भाजपाने वापरायला सुरूवात केली.

महाराष्ट्रात गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपाप्रणित महायुतीला मोठा फटका बसला. महाआघाडीचे खासदार मोठ्या संख्येने निवडून आले.

लोकसभा निकालाच्या धक्क्यातून सावरायचे असेल तर महाराष्ट्रात लाडकी बहिण योजना राबवायाची ही कल्पना तत्कालीन मुख्यमंत्री व शिवसेनचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी प्रत्यक्षात अमलात आणली आणि महायुतीला विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळवून दिले. खरे तर कोणत्याच बहिणींनी आम्हाला दरमहा ओवाळणी द्या, असे सरकारकडे मागितले नव्हते. पण निवडणुकीपुर्वीच महायुती सरकारने बहिणींच्या बँक खात्यात दरमहा थेट पंधराशे रुपये जमा करायला सुरूवात केली आणि अडिच कोटी बहिणींचा विश्वास संपादन केला.

महायुतीच्या विरोधात लोकसभा निवडणुकीप्रमाणेच राज्यात नाराजीचे वातावरण असताना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ही गेम चेंजर ठरली आणि विधानसभेच्या २८८ जागांपैकी २३८ जागांवर महायुतीचे आमदार निवडून आले. एवढेच नव्हे तर भाजपाचे विक्रमी संख्येने म्हणजे १३२ आमदार निवडून आले.

जून महिन्यातच मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला एक वर्षे पूर्ण झाले. या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर मोठा भार पडला असून सरकारने अन्य खात्याच' निधी मोठ्या प्रमाणावर या योजनेकडे वळवला आहे. एकीकडे सरकारी तिजोरी खाली होत असताना लाडक्या बहिणींना दरमहा १५०० वरून २१०० रुपये देणार अशा निवडणूक काळात केलेल्या घोषणा महायुतीच्या अंगलट येऊ येऊ लागल्या आहेत.

दुसरीकडे वर्षभरात २६ लाख ३५ हजार अपात्र लाभार्थींनी या योजनेचा लाभ उठवला असेही छाननीत आढळून आले आहे.सर्वात धक्कादायक म्हणजे १४ हजार ८०० पुरूषांनीही लाडकी बहिण योजनेचे पैसे उकळले असेही उघडकीस आले आहे. केवळ मतांसाठी घाईघाईने राबविलेल्या योजतेनूत काही हजार कोटी रुपए कसे अपात्री दान ठरले याच्या सुरस कहाण्या आता बाहेर येत आहेत.

गेल्या वर्षी निवडणूकपूर्व ऑन लाइन पध्दतीने लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज स्वीकारण्यात आले. जो अर्ज करील त्याला दरमहा पंधराशे रुपये दिले जाऊ लागले. अर्जांची बारकाईने छाननी केली जात नव्हती. मतांसाठी कोणाला नाराज करायचे नाही हीच त्यामागची भूमिका असावी. पण आपण करदात्यांचे पैसे कुणाला कसे देतोय याचेही भानही सरकारने ठेवले नाही.

काही कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी आहेत. काही लाभार्थी एकापेक्षा अधिक शासकीय योजनांचा फायदा घेत आहेत. काहींच्या कुटुंबात मोटार ( चार चाकी वाहन ) असूनही त्या लाडक्या बहिणी पंधराशे रुपये घेत आहेत. विशेष म्हणजे सरकारी सेवेत असलेल्या

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

काही महिलाही या योजनेचा लाभ घेत आहेत असे आढळून आले.

लाडकी बहिण योजनेची एसआयटी चौकशी करणार का, अशी विचारणा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ( श प ) खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. लाडकी बहिण योजनेत १४ हजार पुरूष कसे काय घुसले हे मोठे गूढ आहे.

नोंदणी करताना आधार कार्ड व बँक डेटा पोर्टल सोबत जोडले नाही, अर्जदाराचे उत्पन्न- मिळकत- वाहन- कौटुंबिक मालमत्ता यांचे क्रॉस चेकींग झाले नाही, केवळ कागदपत्रे पाहून नोंदणी झाली, फिल्ड व्हेरिफिकेशन कुठे झाले नाही अशी अनेक कारणे आता पुढे येत आहे.

मग या २६ लाख ३५ हजार लाभार्थींनी केलेल्या फसवणुकीला जबाबदार कोण? त्यांच्याकडून त्यांना दिलेले पैसे वसूल करणार का? त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करणार का ?

ज्यांचे अडिच लाखापेक्षा कमी उत्पन्न आहे, त्याच बहिणींना पात्र समजण्यात येईल असे म्हटले होते. ज्यांचे आधारकार्ड व बँक खात्यावर नाव वेगवेगळे आहे, त्यांचा पुर्नविचार केला जाईल असेही म्हटले होते. तरीही लाडकी बहिण योजनेची ओवाळणी घेण्यात लक्षावधींनी फसवणूक केलीच.

लाडकी बहिण योजनेचा लाभ घेत असताना, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणारे आजवर २ लाख ३० हजार आढळले. ६५ वयापेक्षा जास्त असे १ लाख १० हजार लाभार्थी दिसून आले. ज्यांच्या कुटुंबात मोटार आहे अशा १ लाख १० हजार लाड्क्या बहिणी दरमहा पंधराशे रुपये घेत आहेत असेही तपासात निष्पन्न झाले.

लाडकी बहिण योजनेसाठी सरकारकडे राज्यातून २ कोटी ६३ लाख अर्ज आले होते. त्यातल्या २ कोटी ३४ लाख बहिणींना दरमहा १५०० रुपए मिळू लागले. त्यातल्या २६ लाख ८०० बहिणींनी गैरफायदा घेतल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले. अजूनही हा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रावर आज नऊ लाख कोटीचे कर्ज आहे. लाडकी बहिण योजनेवर ४६ हजार कोटींची तरतूद करावी लागते आहे. लाडकी बहिण योजना बंद करावी लागेल असे सत्ताधारी कोणी म्हणत नाही किंवा तसे म्हणण्याची कोणाची हिम्मत नाही. अन्य खात्यांचा विकास निधी लाडक्या बहिणींसाठी सतत वळवावा लागतो आहे .

आपल्या खात्याचा निधी काढून घेतला म्हणून अनेक मंत्री नाराज आहेत. अनेक योजनांना कात्री लावावी लागते आहे. समाज कल्याण, आदिवासी कल्याण, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना, एक रूपया पीक विमा योजना, महात्मा फुले आरोग्य योजना, आनंदाचा शिधा, शिवभोजन अशा अनेक योजना निधी नसल्याने सुस्तावल्या आहेत.

आपल्या कामाचे एक कोटी चाळीस लाख थकले म्हणून सांगली जिल्ह्यात हर्षल पाटील नावाच्या तरूण कंत्राटदाराने नुकतीच आत्महत्या केली. हे प्रकरण खूप तापल्यावर सरकारने त्याला थेट कंत्राट दिले नव्हते, तो उपकंत्राटदार असावा असा खुलासा जबाबदार मंत्र्यांनी केला. राज्यातील कंत्राटदारांची ९० हजार कोटींची बिले थकली आहेत त्याविषयी सरकार काहीच बोलत नाही.

तिजोरी रिकामी असताना व अन्य खात्यांचे निधी वळवावे लागत असताना लाडकी बहिण योजना आणखी किती काळ चालवणार? रोजगार आणि सुरक्षा देण्याऐवजी लाडकी बहिण योजना मतांसाठी सत्ताधारी पक्षाला सोयीची वाटत असेल पण हे रेवडी कल्चर योग्य आहे का?

सरकारी तिजोरीचा वापर लाडकी बहिण योजनेतून मतांसाठी होत असल्याने कोणताही राजकीय पक्ष त्याला विरोध करणार नाही, उलट आम्ही सत्तेवर आल्यावर ओवाळणी वाढवून देऊ असे आश्वासन देत असतो. राज्याची आर्थिक स्थिती कितीही बिकट असली तर लाडक्या बहिणींसाठी काहीही अशी मानसिकता राजकीय पक्षांची बनली आहे.

# किशोरदा अजूनही जिवंत आहेत...









तेरे बिना ज़िंदगी से कोई शिकवा तो नहीं...
पण आज किशोरदा यांच्या जयंतीनिमित्त जेव्हा आपण त्यांच्या आठवणींत हरवतो, तेव्हा खंडव्यातील एक जीर्ण हवेली आपल्या शांत आवाजात विचारते.... खरंच विसरून गेलात का मला?

**खंडव्याच्या श्वासातच मिसळलेली किशोरदा यांची सावली**

खंडवा शहराच्या मध्यभागी असलेली गौरी कुंज म्हणजेच गांगुली हाऊस, ही आता फक्त विटा आणि मलब्याचा ढाचा उरला आहे, पण एक काळ होता जेव्हा हे घर एका संगीतयुगाची साक्ष देत होतं. ४ ऑगस्ट १९२९ रोजी याच ठिकाणी आभास कुमार गांगुली यांचा जन्म झाला. पुढे याच आभासने किशोर कुमार या नावाने संपूर्ण भारताला वेड लावल, गायक, अभिनेता, दिग्दर्शक आणि विनोदकार म्हणून.



**डॉ. प्रवीण डबली**
**ज्येष्ठ पत्रकार**
**9422125656**

आज मात्र हीच हवेली पडण्याच्या स्थितीत आली आहे. नगरपालिकेने याला धोकादायक इमारत घोषित करत सूचना फलक लावले आहेत.
ज्या भिंतींवर किशोर दा यांचे सूर कधी घुमायचे, तिथे आज ओलसरपणा, गवत आणि अंधाराने घर केले आहे.

*कुछ तो लोग कहेंगे,*
*लोगों का काम है कहना...*

किशोर दा यांचे चाहते म्हणतात की हे घर फक्त त्यांची खाजगी जागा नव्हे, तर भारताचा सांस्कृतिक ठेवा आहे. पण मालकी हक्कावरचे वाद, कुटुंबातील मतभेद आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे हे घर विस्मृतीच्या अंधारात हरवत चालले आहे.
स्थानिक वृत्तांनुसार, सुमारे १४ कोटींना हे घर एका खाजगी व्यावसायिकाला विकले गेले होते, पण सौदा वादात अडकून रद्द झाला.
हे घर अजूनही सरकारी नोंदीमध्ये किशोर कुमार व अनुप कुमार यांच्या नावावर आहे, पण अनेक दशकांपासून ते दुर्लक्षित राहून हळूहळू नष्ट होत आहे.

**सीताराम काकांच्या आठवणीत अजूनही तो आवाज जिवंत आहे...**

या घराचे चौकीदार सीताराम सावनेर गेले ४० वर्षे येथे राहत आहेत. ते सांगतात, किशोर दा जेव्हा खंडव्यात यायचे, तेव्हा म्हणायचे, सीताराम जी, दूध-जलेबी खाना है.फक्कड वृत्तीचे आणि मस्तमौला व्यक्तिमत्त्व होतं त्यांचं. आता अनेक वर्षांपासून त्यांच्या कुटुंबातील कोणीही आलेले नाही. फक्त या घराच्या भिंती त्यांच्या हास्याच्या आणि रियाजाच्या आठवणी जपत आहेत...

**मेरे सपनों की रानी कब आएगी तू**
**पण आता कोण येणार वाचवायला?**

या प्रश्नाचं उत्तर आता प्रशासन, सरकार, समाज आणि संस्कृतीप्रेमींना द्यावं लागेल. किशोर कुमार सांस्कृतिक प्रेरणा मंचसारख्या संघटनांनी सातत्याने ही मागणी केली आहे की या घराला राष्ट्रीय वारसास्थळ घोषित करून येथे संग्रहालय किंवा स्मारक उभारले जावे.

मध्यप्रदेशचे वनमंत्री विजय शाह यांनीही म्हटले होते की, जर कुटुंबाने ही मालमत्ता राज्य सरकारला दिली, तर राष्ट्रीय स्तरावरचे संग्रहालय उभारता येईल. पण आजही सगळं कागदपत्रातच अडकलं आहे.
मुसाफिर हूं यारों, न घर है न ठिकाना
किशोर दा यांची ही जीवनदृष्टीच त्यांना विशेष बनवते .
कधी कोणत्याही चौकटींमध्ये स्वतःला बांधून घेतलं नाही.
त्यांनी आयुष्याला कधीही ओझं मानलं नाही.
आजही त्यांचे छोटा सा घर होगा, बादलों की छांव में हे गाणं त्यांच्या भोळेपणाची आणि भावनाशीलतेची आठवण करून देतं.
खंडव्याचे रहिवासी आणि संपूर्ण भारतातील चाहत्यांची हीच इच्छा आहे की तो छोटा सा घर, ज्याला आज खंडहर म्हटलं जातं, तो पुन्हा जिवंत व्हावा.

**आताही वेळ आहे आपण एक इतिहास वाचवू शकतो**

जर आपण आज गप्प राहिलो, तर काही वर्षांनंतर आपल्याला म्हणावं लागेल...
कधीकाळी इथे किशोर कुमार यांचं घर होतं,
तेव्हा तिथे ना ती हवेली असेल, ना तो वातावरण.
छूकर मेरे मन को, किया तूने क्या इशारा
आज किशोर दा यांची आत्माच आपल्याला असाच इशारा करत आहे.

**काय करता येईल?**

१. सरकारने हस्तक्षेप करून हे घर अधिग्रहित करावे.
२. कुटुंब आणि चाहत्यांच्या सहकार्याने स्मारक वा म्युझियमसाठी प्रस्ताव तयार करावा.
३. स्थानिक तसेच राष्ट्रीय स्तरावर जनजागृती मोहीम राबवावी.
४. प्रसिद्ध कलाकार, चित्रपट निर्माते, संगीतकार यांनी पुढे येऊन पाठिंबा द्यावा.

ज़िंदगी के सफर में गुजर जाते हैं जो मकाम,
वो फिर नहीं आते....
हे मकान एक मकाम होण्याआधी जर आपण ते वाचवू शकलो नाही, तर ती आपल्या पिढीची मोठी चूक ठरेल. खंडव्यातील नागरिक, किशोरप्रेमी आणि संस्कृतीप्रेमी नागरिकांनो, माझी नम्र विनंती आहे,
या जयंतीनिमित्त फक्त गाणी गायची नाहीत
तर ज्यातून ती गाणी जन्माला आली ती माती ती जागा जपावी लागेल.

# इलेक्ट्रिक स्कूटरने शेत कसे कोळपले?




कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने बैल आणि मजुरांच्या कमतरतेला तोंड देण्यासाठी एक अनोखा आणि स्वस्त उपाय शोधला आहे. त्याने आपल्या शेतात कोळपणी करण्यासाठी इलेक्ट्रिक स्कूटरचा वापर केला आहे, ज्यामुळे शेतीचा खर्चही कमी झाला आहे.

चिक्कोडी तालुक्यातील रहिवासी अजित भिमाप्पा म्हणतात की त्यांना त्यांच्या सोयाबीनच्या शेतात कोळपणी करण्यासाठी बैल मिळत नव्हते, म्हणून त्यांनी ही नवीन पद्धत स्वीकारली. अजितकडे सुमारे ३० एकर जमीन आहे.


अजितच्या गावातील इतर शेतकऱ्यांनाही बैलांची कमतरता आणि शेतमजुरांची कमतरता अशाच समस्यांना तोंड द्यावे लागते. आता या उपक्रमामुळे इतर शेतकऱ्यांनाही आशा मिळाली आहे. अजितने त्याच्या इलेक्ट्रिक स्कूटरच्या मागील बाजूस कृषी विभागाने दिलेला एक नवीन नांगर जोडला आहे.

अजित स्कूटर चालवत असताना, कुटुंबातील दुसऱ्या सदस्याने कोळपे धरले आहे, ज्यामुळे कुटुंबाला एका दिवसात सुमारे दोन एकर जमीन कोळपता येते. या बाईकने खूप कमी खर्चात कोळपणी करता येते.

■ ■ ■

## : दोन राष्ट्रगीतांचे जनक : गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी.



रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली.

वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले.

१४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ₹सर₹ ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत.

पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला.

रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते.

छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला.

बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो.

एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते.

त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

■ ■ ■

## पेटाने धार्मिक बाबींत हस्तक्षेप करू नये!

**वाचक लिहितात**

कोल्हापूर येथील शिरोळ तालुक्यातील नांदणी गावात एक वरकरणी छोटासा वाटणारा मात्र राज्याचे आणि देशाचे लक्ष वेधून देणारा, सामान्य जनजीवन ढवळून काढणारा वेगळा विषय येथे चर्चेत आहे. तो निर्माण झाला कुप्रसिद्ध असलेल्या प्राणी प्रेमी संघटना पेटामुळे.

पेटा म्हणजे प्राण्यांच्या नैतिक उपचारांसाठी कार्यरत असलेल्या लोकांचा समूह. या समूहाने नांदणी गावातील जैन मठातील महादेवी किंवा माधुरी नावाची हत्तीण. ही हत्तीण ३३ वर्षांपासून मठात राहत होती.
तिच्यावर मठात अन्याय होत आहे, तिला तिच्या नैसर्गिक अधिवासात राहण्यापासून वंचित ठेवले जात आहे ह्या विरोधात पेटाने सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल केला होता.

सर्वोच्च न्यायालयाने पेटाचे म्हणणे मान्य करत तिला तिच्या नैसर्गिक अधिवासात राहण्यासाठी गुजरात येथील वनताराशी संबंधित एका न्यासा बरोबर सोपवण्याचे सर्वोच्च न्यायालयाने अंतिम निर्णय दिला. प्राणीमित्र संघटनेने प्राण्यांना घोर / चुकीची वागणूक देण्याच्या विरोधात कार्य केले पाहिजे पण धार्मिक गोष्टींमध्ये हस्तक्षेप करणे चुकीचे आहे.

जैन मठाने या हत्तीणीला चांगल्या प्रकारे पालन पोषण करून वाढवले होते. तिची मठात उत्तम व्यवस्था ठेवली होती. तिच्याशी मठातल्या आणि गावातल्या लोकांच्या भावना जोडलेल्या होत्या. नांदणी गावातून निघताना हत्तीणीला आलेले अश्रू जगाने पाहिले आहेत. सर्व लोकांना डोळे भरून पहात त्या हत्तीणीने अधिवासात नेणाऱ्या ट्रकमध्ये प्रवेश केला. पेटा ही संस्था विदेशी पैशावर चालणारी संस्था असून हिंदू धर्मातल्या प्राण्यांप्रती असलेल्या भावनेचा अपमान करण्याचे धाडस दाखवते.

इतर वेळी इतर धर्मात होणाऱ्या पशु हत्येच्या संदर्भात विरोध करत नाही. जाणून बुजून हिंदू संस्कृती आणि त्यांच्या प्रतीकावर हल्ला करण्याच्या षडयंत्रात पेटा ही संस्था अग्रसर आहे. बकरी ईद ला अनेक बकऱ्या व गोवंश (गोवंश हत्या बंदी कायदा राज्यात अस्तित्वात असतांना देखील) यांची हत्या केली जाते ते थांबाविण्याचे धाडस पेटा दाखवत नाही.

हिंदू संस्कृतीत अनेक प्राणी पशु अनेक दैवतांचे वाहन आहे व ते पूजनीय आहे. पेटा सारख्या संस्था याचाच फायदा घेऊन आपल्या परंपरा व संस्कृतीवर आक्रमण करतात. सरकारने कडक कारवाई करावी व त्यांना ज्या देशातून पैसा मिळत आहे त्या देशात त्यांना परत पाठवणे हे आद्य कर्तव्य म्हणून व जनभावनांचा आदर करून लवकरात लवकर ते करणे अपेक्षित आहे. चराचरात ईश्वर मानणारी भारतीय सनातन संस्कृती महान आहे. तिचे रक्षण करणे सर्वांचे कर्तव्य आहे.

■ **लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

### रक्षाबंधन

रक्षाबंधन हा सण श्रावण पौर्णिमेला साजरा केला जातो. या वर्षी ही तिथी ९ ऑगस्ट २०२५ या दि?वशी आहे. बहीण आपल्या भावाचे औक्षण करून त्याला प्रेमाचे प्रतीक म्हणून राखी बांधते. भाऊ आपल्या बहिणीला ओवाळणी म्हणून भेटवस्तू देऊन तिला आशीर्वाद देतो. राखी बांधण्यामागे भावाची भरभराट व्हावी आणि भावाने बहिणीचे संरक्षण करावे, ही भूमिका असते. रक्षाबंधन या सणाच्या माध्यमातून भाऊ आणि बहीण यांच्यातील प्रेम व्यक्त केले जाते. पाताळातल्या बळीराजाच्या हाताला लक्ष्मीने राखी बांधून त्याला आपला भाऊ केले आणि नारायणाची मुक्तता केली. तो दिवस श्रावण पौर्णिमेचा होता. रक्षाबंधन हे पर्व समाजातील तुटलेल्या मनांना जोडण्याची एक चांगली संधी आहे. रक्षाबंधन च्या आगमनाने कुटुंबातील आपापसातील कलह शांत होऊ लागतो, दुरावा दूर होऊ लागतो आणि सगळीकडेच आनंद,उत्साह निर्माण होऊ लागतो.

■ **सौ. वर्षा आवदे, नागपूर.**

## कान साफ करण्यासाठी कॉटन बड्स सोडा



कान हे आपल्या शरीराचा एक अत्यंत नाजूक आणि महत्त्वाचा भाग आहेत. पण अनेकदा आपण त्यांच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतो. काही लोक कानातला मळ काढण्यासाठी कॉटन बड्स किंवा टोकदार वस्तू वापरतात, जे खूप धोकादायक असू शकते. पण तुम्हाला माहीत आहे का, काही सोप्या आणि सुरक्षित घरगुती उपायांनी तुम्ही कानातला मळ सहज काढू शकता?

**कानातला मळ काढण्याचे सुरक्षित उपाय**

**कोमट पाणी** : कोमट पाणी कानातला मळ सैल करण्यासाठी मदत करते. एका ड्रॉपरच्या मदतीने कोमट पाण्याचे काही थेंब कानात टाका. काही वेळ थांबा आणि नंतर डोके झुकवून पाणी बाहेर काढून टाका. हा उपाय खूप सोपा आणि सुरक्षित आहे.

**खोबरेल तेलः** खोबरेल तेल (नारळाचे तेल) कानात जमा झालेला कोरडा मळ मऊ बनवण्यास मदत करते. रात्री झोपण्यापूर्वी २-३ थेंब खोबरेल तेल कानात टाका आणि दुसऱ्या दिवशी सकाळी हलक्या हाताने कान स्वच्छ करा.

**हायड्रोजन पेरॉक्साइडचे मिश्रणः** हायड्रोजन पेरॉक्साइड आणि पाणी समान प्रमाणात मिसळा. हे मिश्रण कानात टाकल्यास मळ फेस होऊन बाहेर येतो. पण हा उपाय आठवड्यातून फक्त एकदाच करा.

**बेकिंग सोडाः** १ चमचा बेकिंग सोडा २ चमचे पाण्यात मिसळून मिश्रण तयार करा. या मिश्रणाचे २-३ थेंब कानात टाका. १० मिनिटांनी डोके झुकवून कान साफ करा. हा उपाय जास्त प्रमाणात साठलेला मळ काढण्यासाठी उपयुक्त आहे.

**मिठाच्या पाण्याचा वापर** : मीठ मिसळून तयार केलेले द्रावण कान साफ करण्यासाठी प्रभावी आहे. कापसाचा बोळा या द्रावणात बुडवून त्याचे काही थेंब कानात टाका आणि नंतर डोके झुकवा.

**गरम पाण्याची वाफ** : गरम पाण्याची वाफ घेतल्यानेही कानाच्या आतील मळ आणि घाण मऊ होऊन बाहेर येते. विशेषतः हिवाळ्यात हा उपाय केल्यास खूप आराम मिळतो.

हे उपाय करताना नेहमी लक्षात ठेवा की कानाच्या आत जास्त खोलवर काही घालू नका. जर तुम्हाला कानाच्या आत जास्त वेदना होत असतील किंवा संसर्ग झाल्याची शंका असेल, तर डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## सुजाण पालकत्व

पालकांनो तुम्ही थोडे
आता बेशरम व्हा गडे
मुलामुलींना द्या न लाजता
गुड टच बॅड टचचे धडे..!

प्रेमाचे नाटक करून
मुलींचे होते आहे अपहरण
तुम्ही करत रहाल
नाहीतरआयुष्यभर रुदण..

निष्पाप असती बालके
यौन बदलांचे नसते ज्ञान
धोक्यांची सुचना देणे
पालकांचे कर्तव्य जाण..!

महासागर
●गुरुवार, दि.७ ऑगस्ट २०२५
अकोला


# जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.आरती कुलवाल यांची स्वीकारला पदभार

**अकोला :** जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून मंडळाच्या कुलवाल यांची नियुक्ती झाली असून डॉ. आरती कुलवाल यांनी मंगळवारी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयात पदभार स्विकारला. तसेच अकोला जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकीय अक्षिक्षक म्हणून डॉ. वंदना वसो- पटोकार यांची नियुक्ती झाली आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नवजात शिशु अतिदक्षता विभागासाठी सन २०२४- २५ मध्ये ३१ सपोर्ट स्टाफ करिता ई - निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्या होत्या निविदा प्रक्रिया नियमबाह्य व अतांत्रिक पध्दतीने करण्यात आल्याचे प्रथमदर्शन निदर्शनास आल्याने जिल्हा शल्य चिकित्सकासह तिघा अधिकाऱ्यांवर १ ऑगस्ट रोजी राज्य शासनाचे कार्यासन अधिकारी यांच्या स्वाक्षरीने निलंबनाचे आदेश जारी करण्यात आले.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ४ च्या पोटनियम(१) (अ) च्या तरतुदीनुसार डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा शल्यचिकित्सक अकोला, अकोला जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक जयंत पाटील तसेच स्त्री रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी डांबरे यांना निलंबित करण्यात आले होते. नवनियुक्त जिल्हा शल्य चिकित्सकाची जबाबदारी उपसंचालक कार्यालयाच्या सहायक संचालक डॉ. आरती कुलवाल, तर जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधिक्षक पदावर डॉ. वंदना वसो- पटोकार यांची नियुक्ती झाल्याचे कळते. दरम्यान, जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सऊद देशमुख यांची स्थानिक पातळीवर तात्पुरती नियुक्ती करण्यात आली होती.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ २०२५ सालच्या प्रतिष्ठित
# ‘इन्स्टिट्यूशनल फेलो अवार्डने’ सन्मानित!

**▪अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
भारतीय उद्यानिकी संघटनांच्या महासंघाद्वारे बिहार राज्यातील साबौर येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय फलोत्पादन परिसंवादाचे औचित्य साधतं देशभरातील उद्यानिकी शास्त्रज्ञा समक्ष कृषि क्षेत्रात अत्युच्च कामगिरी केल्याबद्दल डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांना ‘चाय-इन्स्टिट्यूशनल फेलो अवार्ड २०२५‘ देऊन सन्मानित केले. तसेच त्यांच्या मार्गदर्शनात या विद्यापीठाच्या प्रगतीची घोडदौड सुरू आहे असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांना देखील त्यांच्या शिक्षण, संशोधन, विस्तार कार्यासह विकासात्मक कार्याची दखल घेत राष्ट्रीय स्तरावरील ‘ ऑनर्ड फेलो अवॉर्ड ‘ हा प्रतिष्ठेचा




पुरस्कार प्रदान करीत गौरव केला.

कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे वतीने विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर येथील कृषि व्यवसाय व्यवस्थापन शाखेचे संचालक प्रा. डॉ. प्रकाश कडू यांना सदर पुरस्कार स्वीकारला.

या अतिशय महत्वपूर्ण आणि प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्तीसाठी कृषि विद्यापीठात आनंदाचे वातावरण असून विद्यापीठ परिवाराचे वतीने कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अभिनंदन करण्यात आले कुलगुरू कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झालेल्या या सत्कार प्रसंगी अधिष्ठाता कृषी डॉ. देवानंद पंचभाई, संचालक संशोधन डॉ. श्यामसुंदर माने, संचालक विस्तार शिक्षण डॉ धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे, उद्यानविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. अरविंद सोनकांबळे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे, विद्यापीठ नियंत्रक राजीव कटारे, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी, विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे, सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, विभाग प्रमुख आदींची उपस्थिती होती.

# आगामी धारागड यात्रा बंदोबस्तच्या पार्श्वभूमीवर अवैध दारु विक्रीवर धाड

**▪अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे.धारगड यात्रा बंदोबस्त जवळ असताना ग्रामीण भागात, अवैध दारू चे प्रमाणात वाढ झाल्याची गुप्त बातमी पोलीस अधीक्षक सरांना प्राप्त झाली होती त्यावरून पोलीस अधीक्षक यांनी पोलीस निरीक्षक श्री शंकर शेळके यांना आदेशीत केले, त्या नुसार पथक तयार करून आज दि. ०५/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा अकोला चे पथकाला मिळालेल्या गुप्त बातमी वरून शासकीय वाहनाने जाऊन पो स्टे अकोट ग्रामीण हद्दीतील ग्राम बोर्डी येथे पंचासमक्ष देशी दारूची रेड केली असता, आरोपी नामे श्याम अर्जुन लटकुटे वय ३६ रा. बोर्डी ता. अकोट जि अकोला याचे ताब्यात देशी दारू संत्रा ९९९, व टँगो पंच ९० एम एल चे एकूण २१२ नग एकूण किंमत ८,४८० / - चा मुद्देमाल आरोपी कडून जप्त करून आरोपी



विरुद्ध कलम ६५ ई महाराष्ट्र दारुबंदी कायाद्यान्वये पो स्टे अकोट ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात येत आहे. यापुढेही ग्रामीण भागतील अवैध धंदे वर कडक कारवाही करण्यात येणार आहें.


# मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी घेतला टॅक्स वसुलीचा आढावा



**▪अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
६ ऑगस्ट २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे अकोला महानगरपाकेच्या डॉ.बाबासाहेब मुख्य सभागृह येथे मालमत्ता कर विभागाची कर वसुली बाबत आढावा बैठक घेतली.या बैठकीत सर्वप्रथम मनपा आयुक्त यांनी आजपर्यंत करण्यात आलेल्या मालमत्ता कर वसुली बाबतचा आढावा घेतला. तसेच यावेळी, जास्त प्रमाणात थकबाकी असलेल्या मालमत्ता धारकांकडे भेटी देऊन थकित कराची वसुली करणे, जे मालमत्ता धारक भेटी देऊनही थकित कराचा भरणा करत नाही अशा मालमत्ता धारकांवर नियमानुसार कार्यवाही करणे, तसेच महानगरपालिकेचा उत्पन्नाच्या दृष्टीने मालमत्ता कर हे मुख्य स्त्रोत असून मनपाच्या उत्पन्नात वाढ व्हावी याकरिता शहरात नवीन बनलेल्या इमारतींवर कर आकारणी करणे आदींबाबत सुचना दिल्या, तसेच ज्या कर वसुली लिपिकांची मालमत्ता कर वसुली समाधान कारक होणार नाही.

# करतवाडी रेल्वे येथील ४७ वर्षीय इसमाची गळफास लावून आत्महत्या

**▪चोहोट्टा बाजार,दि ६ (प्रतिनिधी) :**
परिसरातील करतवाडी रेल्वे येथिल, संतोष पंजाबराव चेचरे वय ४७ वर्ष यांनी,चोहोट्टा बाजार ते करतवाडी रेल्वे मध्ये असलेल्या, घोडीच्या नाल्याच्या बंगाली, झुडपाच्या मध्ये झुडपाच्या संध्याकाळी, आत्महत्या केली.आत्महत्यांची माहिती दहिहंडा पोलिसांना मिळताच चोहोट्टा बाजार पोलिस चौकी चे पोलीस कर्मचारी, यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. परिसरात खळबळ उडाली होती.आत्महत्या केलेला इसम



शेतकरी असल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली आहे ..त्यांच्या कडे शेती असून, कर्ज,बँकेचे कर्ज, असून , अल्पभूधारक शेतकरी असून आत्महत्या केल्याचे गावकऱ्यांमध्ये चर्चा सुरू आहे. दहिहंडा पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून, छविचीदन करिता अकोट येथील ग्रामीण रुग्णालय पाठविला आहे. त्यांच्या पश्चात, पत्नी दोन अल्पवयी मुली, असा परिवार आहे. आत्महत्येचे कारण, अद्याप स्पष्ट झालेले नाही..पोलिसांच्या तपासात पुढे समोर येणार. पुढील तपास दहीहंडा पोलिस करित आहेत.

# पिंजर फाट्यावरील अपघातात बाप लेक ठार

**बार्शीटाकळी :** अकोला- मंगरुळपीर रोडवर पिंजर फाट्याजवळ मंगळवारी दुपारी चार वाजे दरम्यान हृदयद्रावक अपघातात भरधाव पिकअप वाहनाने दुचाकीस्वार बापलेकांना जोरदार धडक दिल्याने दोघांचाही या जागीच मृत्यू झाला. अपघातामुळे परिसरात हळहळव्यक्त केली जात आहे. अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे मेश रमेश शिरसाट (३२) व त्यांचे वडील रमेश हरिभाऊ शिरसाट (६०) रा. समता नगर, लाखनवाडा अशी आहेत. बापलेक काम ासाठी दुचाकीवरून पिंजर फाट्याकडे जात असताना पाठीमागून आलेल्या भरधाव पिकअप वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही दूर फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले. दोघांच्या डोक्याला मार लागला होता.अपघाताची माहिती मिळताच बार्शीटाकळी पोलिस घटनास्थळी पोहोचले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी जखमी अवस्थेतील बापलेकांना बार्शीटाकळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवले.

# सामूहिक पार्थिव शिवलिंग पूजन व अभिषेक सोहळा उत्साहात संपन्न

**▪अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
श्री रामनवमी शोभायात्रा समिती आणि श्री जानकीवल्लभो मातृशक्ती सत्संग मंडळ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.सर्व महिला भक्तांनी सामूहिकरित्या पार्थिव शिवलिंग निर्मिती करून, विधीवत पूजा-अभिषेक व मंत्रोच्चारांसह भगवान शिवाचा महाअभिषेक केला. पारंपरिक रितीरिवाज, स्तोत्रपठण व हर हर महादेवच्या घोषात संपूर्ण परिसर पावन झालेला दिसून आला.या कार्यक्रमामध्ये महिलांची विशेष उपस्थिती लक्षणीय होती. पूजनासाठी आवश्यक पूजासाहित्य भक्तांनी स्वतः आणून व काहीसमिती मार्फत देण्यात आले होते, हे विशेष. या सामूहिक धार्मिक उपक्रमामुळे सम ाजात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले.



कार्यक्रम यशस्वीतेसाठी समितीतील पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.शेवटी, उपस्थित सर्व भक्तगणांनी ‘हर हर महादेव‘ व ‘जय श्रीराम‘च्या घोषात कार्यक्रमाचा समारोप केला.मंजुषाताई सावरकर, अर्चना शर्मा, आरती शर्मा, वैशालीताई शेळके,चंदाताई शर्मा,रश्मी कायंदे,वैशालीताई शेगोकार,म ालती रणपिसे, पुष्पा वानखेडे मनीषा भुसारी सारिका देशमुख संतोष शर्मा पुरीताई छाया तोडसाम दीपिका ठाकूर सुरेखा नबापुरे, स्वरा नवापुरे,साक्षीकणळकर, नीता मोरे, नंदिनी कांबळे,अंजूबानिया,रीना बानिया,स्वाती बाबिया,आशा वडस्कर,अनिता झाडे आदि हे उपस्थित होते.

# विदर्भामध्ये एक लक्ष वृक्ष लागवडीचा संकल्प

**अकोला** : तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा उद्योजक डॉ. सुगत वाघमारे यांच्या संकल्पनेतून विदर्भाम ध्ये एक लाख वृक्ष लागवडीची मोहिम राबविण्यास सुरुवात केली व पंचशिल बुद्ध विहारामधील परिसरामध्ये २० चांगल्या जातीची झाडे झाडे लावून मोहिमेचा शुभारंभ केला आहे.

# सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर सोबतच गावातिल सर्व शिक्षन संस्था व शाळे मध्ये नशामुक्ती शपथ व रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन

**▪हिवरखेड,दि ६ (प्रतिनिधी) :**
येथील सरस्वती प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्या मंदिर तसेच सरस्वती कॉनव्हेन्ट, जिल्हापरीषद महात्मा गांधी वीध्यालय होलीपेथ कानव्हेट मराठी मुलाची जि प शाळा या मध्ये ओम शांती केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले आणि त्यांना सदाचरणाचे धडे दिले गेले.

यावेळी रक्षाबंधनाचा विशेष कार्यक्रम देखील घेण्यात आला. ओम शांती केंद्र, हिवरखेडच्या प्रमुख रश्मी दीदी व अकोला येथील अर्चना दीदी यांनी शाळेतील सर्व शिक्षकांना राखी बांधून त्यांना सद्भावना, शुद्धता व सेवाभाव यांचे सह आजच्या घडीला शिव रक्षासूत्र राखीचे सुरक्षा कवच असून त्याचे महत्त्व पटवून दिले.कार्यक्रमास ओम शांती केंद्र हिवरखेडचे श्री. बाळासाहेब



नेरकर ब्रम्हाकूमार देवीदास भाई व त्यांचे सहकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनीही विद्यार्थ्यांना प्रेम, बंधुभाव आणि नशामुक्त जीवनाची प्रेरणा दिली. सरस्वती प्राथमिक शाळेमधील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.अमोल भोंगाळे सर, शिक्षिका सौ. राऊत मॅडम, सहाय्यक शिक्षक श्री.धमाळ सर, श्री सोळंके सर श्री कवळकर सर, श्री.खेट्टे सर, श्री. कौलकर सर, श्री.धारपवार सर व शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी पुढाकार घेतला यावेळी नीर्मला घुंगड मॅडम राऊत मॅडम रेड्डी मॅडम विरघट सर यांनी सूद्दा जिल्हा परीषद महात्मा गांधी वीद्यालयामधे नशामूक्ती व रक्षासूत्र या ओमशांतीकडुन आयोजीत कार्यक्रमात भाग घेतला.

# दि. अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून वाशिम जिल्हा परिषदेला डिजिटल बँकिंग सेवा प्रदान

**▪अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
दि. अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत वाशिम जिल्हा परिषदेच्या उपकर खात्यासाठी डिजिटल बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अर्पित चौहान यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री. चौहान यांनी बँकेने डिजिटल सेवा प्रदान केल्याबद्दल आभार व्यक्त करत या सुविधेमुळे जिल्ह्यातील लाभार्थी, कंत्राटदार, जिल्हा परिषद कर्मचारी, व्हेंडर इत्यादींना उपकर खात्यामध्ये ऑनलाइन पद्धतीने रक्कम भरणे शक्य होणार असल्याचे सांगितले.ही सेवा जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. दिनकर जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आली असून, १ ऑगस्टपासून जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवर(htt://



www.zwashim.com) ही सेवा उपलब्ध आहे.या कार्यक्रमाला बँकेचे आयटी विभागाचे उपमुख्याधिकारी श्री. उमेश मोरे, शाखाधिकारी श्री. किशोर चव्हाण, श्री. प्रसन्ना राठोड, श्री. विष्णू राठोड तसेच जिल्हा परिषदेचे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. योगेश क्षीरसागर, लेखाधिकारी श्री. प्रवीण पंधारे, श्री. सज्जन हेंद्रे तसेच वित्त विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.या सेवेच्या अधिक सुलभ वापरासाठी बँकेने विशेष मोबाईल ॲपची निर्मिती केली असून, AWDCC BANK CHALLAN PAYMENT या नावाने ते Google Play Store वर उपलब्ध आहे. या ॲपच्या माध्यमातून चलान भरणे आता अधिक सुलभ झाले आहे.

बँकेचे अध्यक्ष, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी व चिफ टेक्नॉलॉजी ऑफिसर हे नेहमीच ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत नवनवीन डिजिटल सेवा पुरवण्यासाठी सातत्याने अग्रेसर असतात.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in my Educational Documents
----From-----
**UMESH SANTOSHRAO KHADKE**
------TO-------
**UMESH SANTOSH KHADKE**
My Residential Addess is - Dabki Road Near Shahu Market Kuber Nagar Akkalkot Akola city Akola 444002.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
----From-----
**KHALEDA BANO FAIYAZ SHAIKH**
------TO-------
**KHALEDA PARVEEN FAIYYAZ BAGWAN**
My Passport No is **K6774440**
My Residential Address is - Al hira Apartment F.no.4 Firdous colony Muzaffar nagar Akola 444006

# ‘विशेष सहाय योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डिबीटी व्दारे अनुदानाचे वाटप करणे’

**▪बार्शिटाकळी,दि ६ (प्रतिनिधी) :**
तहसिल कार्यालय बार्शिटाकळी येथे महाराष्ट्र शासनाचे दिनांक २९ जुलै २०२५ चे शासन निर्णयातील निर्देशानुसार महसुल सप्ताह निमित्त मा.जिल्हाधिकारी अकोला अजित कुंभार (भाप्रसे) , मा.उपविभागीय अधिकारी मुर्तिजापुर संदीपकुमार अपार व तहसिलदार बार्शिटाकळी राजेश वझिरे यांच्या मार्गदर्शनात बार्शिटाकळी तालुका मध्ये ‘विशेष सहाय योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डिबीटी व्दारे अनुदानाचे वाटप करणे’ अभियान संपन्न झाल्याबाबत नितीन मात्रे नायब तहसलिदार बार्शिटाकळी यांनी माहिती दिली.

सदर महसुल विभागातील अभियान दरम्यान बार्शिटाकळी तालुक्यातील सर्व ग्राम महसुल अधिकारी यांनी संजय गांधी योजना विभागातील लाभार्थी यांचे घरोघरी भेटी देऊन शासनाचे डिबीटी पोर्टल व्दारे राज्य पुरस्कृत शासनाचे विशेष सहाय योजनेतील श्रावण बाळ योजना व संजय गांधी निराधार योजना लाभार्थी यांच्या डिबीटी पोर्टलवरील त्रुटीचे निराकरण केले. ज्या लाभार्थी यांचे आधार अपडेट नाही व आधार बँक संलग्नीकरण नाही याबाबत लाभार्थी यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

सदर मोहिमे दरम्यान लाभार्थी यांचे आधार प्रमाणीकरण करून डिबीटी व्दारे अनुदान वाटप करिता पात्र करण्यात आले. सदर विशेष माहिमे दरम्यान एकुण ६५ लाभार्थी मंजुर करण्यात आले असून एकुण ९०४२ लाभार्थी शासनाचे डिबीटी पोर्टलवर रजिस्ट्रेशन करण्यात आलेले आहे. तसेच एकुण ८५१५ लाभार्थी यांचे डिबीटी पोर्टलवर आधार प्रमाणीकरण करण्यात आलेले आहे.

# दिपक मुंडोकार भाजपा ओबीसी चे तालुका प्रमुख



**अकोट** : तालूक्यातील मुंडगाव येथील भारतीय जनता पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते तथा भावी पंचायत समीती सदस्य म्हनुन सर्कल मुंडगाव ची जनतेच्या मनातील ताईत असलेले व विकास महर्षी आम दार प्रकाशभाऊ भारसाकळे यांचे विश्वासू तथा नेहमी जनते सोबत जनसपर्क ठेवुन पक्षाचे सघटक म्हनुन भाजपाचे वरीष्ट नेतृत्वात नेहमी सपर्कात राहुन पक्षाचे ध्येय जनमानसात रुजविनारे लोकसभा असो की विधानसभा असो पक्षासाठी रात्रदिवस एक करनारे व नेहमी विभातुन पक्षाला जास्तित जास्त मतदान वाढन्यासाठी पुढाकार घेनारे दिपक मूंडोकार यांची तालूका अध्यक्ष गोपाल मोहोड यांनी आमदार भारसाकळे तथा जील्हा अध्यक्ष संतोष शिवरकर यांचेशी विचार विनीमय करुन अकोट तालुका भाजपाचे औबीसी आघाडीचे अध्यक्ष पदी निवड केली.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# अस्मिता

## चटपटीत कटलेट

रुचिरा




पावसाळ्यातील रम्य संध्याकाळी एखादी गरमागरम आणि चविष्ट डिश हवी असेल तर नूडल्स कटलेटचा पर्याय निवडता येईल. चहापानाला येणाऱ्या पाहुण्यांनाही ही डिश नक्कीच आवडेल.

**साहित्य :** आटा नूडल्सचं एक पाकीट, किसलेला कोबी एक कप, अर्धा कप चीझ, एक कांदा बारीक चिरून घ्या, एक हिरवी मिरची, तीन चमचे कॉर्नफ्लोर, तेल आणि मीठ इत्यादी.

**कृती :** पाकिटावरच्या सूचनांनुसार नूडल्स उकडून घ्या. उकडताना त्यात मसालाही घाला. नूडल्स थंड होऊ द्या. आता किसलेल्या कोबीमध्ये कांदा, हिरव्या मिरचीचे तुकडे आणि मीठ घाला. हे मिश्रण थोडा वेळ बाजूला ठेवा. आता हे मिश्रण आणि कॉर्नफ्लोर नूडल्समध्ये घालून सर्व घटक नीट मिसळून घ्या आणि नूडल्सच्या मिश्रणाचे चपट्या आकाराचे कटलेट्स करा. फ्राईंग पॅन किंवा कढईत तेल घाला. आता ही कटलेट्स डीप किंवा शॅलो फ्राय करता येतील. ही गरमागरम कटलेट्स सॉस किंवा चटणीसोबत खा.

## सौंदर्याची गुरुकिल्ली

सौंदर्यसाधना




चमकणारी त्वचा सौंदर्याचे प्रतीकच नाही तर चांगल्या आरोग्याचे लक्षणही आहे. परंतु वाढते प्रदूषण, चुकीची जीवनशैली आणि ताण त्वचेला नुकसान पोहोचवू शकतात. सुंदर दिसण्यासाठी आजकाल अनेकजणी महागडी कॉस्मेटिक उत्पादने वापरतात पण कधीकधी त्याचा काहीच उपयोग होत नाही. म्हणूनच आज त्वचेचे सौंदर्य टिकवणाऱ्या काही महत्त्वपूर्ण गोष्टींची चर्चा करु या.

* पाणी ही त्वचेची पहिली गरज आहे. निर्जलीकरण झाल्यास त्वचा कोरडी आणि सुरकुत्या दिसू लागते. म्हणून दिवसातून पुरेसे पाणी प्या. पावसाळ्यात फारशी तहान लागत नसली तरी आठवणीने पाणी प्या. * आजकाल महिला चवीकडे लक्ष देतात परंतु योग्य पोषणाकडे त्यांचे दुर्लक्ष होते. मात्र फळे, भाज्या, काजू आणि बियांचे सेवन त्वचेसाठी खूप महत्त्वाचे आहे. त्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडेंट्स असल्यामुळे त्वचेच्या पेशी दुरुस्त होतात आणि त्वचा तरुण दिसते. त्यामुळे हे घटक आहारात ठेवा.

* तणावाचा परिणाम थेट तुमच्या त्वचेवर दिसून येतो. जास्त ताणामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या येतात आणि त्वचेची चमकही कमी होते. ध्यान, योग आणि हलका व्यायाम ताण कमी करतो आणि त्वचा निरोगी ठेवतो. म्हणूनच दररोज ध्यान आणि योग करणे त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. * त्वचा चमकदार बनवण्यासाठी योग्य जीवनशैली आणि त्वचेची योग्य समज राखणे गरजेचे आहे. त्वचेला अधिक प्रेम आणि लक्ष द्याल तितकी ती अधिक चमकेल. म्हणून दैनंदिन दिनचर्येत त्वचेची काळजी घेण्यास प्राधान्य द्या आणि योग्य सवयी विकसित करा.

## सामर्थ्य आणि समर्पणाचा सेतू

मानिनी



जम्मू आणि काश्मीरच्या रियासी जिल्ह्यात बांधलेला चिनाब रेल्वे पूल जगातील सर्वात उंच रेल्वे पूल आहे. त्याची उंची ३५९ मीटर असून ती आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर जास्त आहे. मध्यंतरीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भव्य पुलाचे उद्घाटन केले. हा पूल म्हणजे मोठा तांत्रिक चमत्कार आहे आणि काश्मीर खोऱ्याला देशाच्या उर्वरित भागाशी जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा देखील आहे.

या अद्भूत पुलाच्या बांधकामात अनेक अभियंते आणि तज्ज्ञांनी योगदान दिले आहे. परंतु प्राध्यापक जी. माधवी लता यांनी त्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरूच्या वरिष्ठ प्राध्यापक असून १७ वर्षांपासून या प्रकल्पाशी संबंधित आहेत. भू-तंत्रज्ञान सल्लागार म्हणून पुलाच्या डिझाइन आणि मजबुतीमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या सल्ल्याने पुलाचा पाया मजबूत करण्यास मदत झाली आहे. तेव्हा या मानिनीच्या कामाला सलाम करायला हवा.

प्रा. माधवी लता यांनी १९९२ मध्ये जवाहरलाल नेहरू टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीमधून सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये बी.टेक केले. त्यानंतर त्यांना एनआयटी वारंगलमधून एमटेकमध्ये सुवर्णपदक मिळाले. २००० मध्ये आयआयटी मद्रासमधून त्यांनी पीएचडी पूर्ण केली. २०२१ मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट महिला भू-तंत्रज्ञान संशोधक म्हणून आणि २०२२ मध्ये आणखी एका महत्त्वपूर्ण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

चिनाब पुलाचे बांधकाम सोपे नव्हते कारण परिसरातील जमीन, हवामान आणि भौगोलिक परिस्थिती खूपच आव्हानात्मक होती. हे लक्षात घेत प्रा. माधवी लता आणि त्यांच्या टीमने 'डिझाइन-अॅज-यू-गो' नावाचे मॉडेल स्वीकारले. या तंत्रात वास्तविक वेळेत जमिनीच्या परिस्थितीनुसार डिझाइनमध्ये बदल करण्यात आले. त्यांनी रॉक अँकरच्या प्लेसमेंट आणि पुलाच्या स्थिरतेशी संबंधित तांत्रिक सल्ला दिला, ज्यामुळे पूल मजबूत आणि टिकाऊ बनला.

अलीकडेच, प्रा. माधवी लता यांनी 'इंडियन जिओटेक्निकल जर्नल' च्या महिला विशेष अंकात 'डिझाइन अॅज यू गो: द केस स्टडी ऑफ चिनाब रेल्वे ब्रिज' या शीर्षकाचा एक पेपर प्रकाशित केला आहे. यामध्ये त्यांनी बऱ्याच गोष्टींचा उलगडा केला आहे.

चिनाब पुलाची खास वैशिष्ट्ये म्हणजे ता पुलाची उंची ३५९ मीटर असून तो १,४८६ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आला आहे. हा उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पाचा एक भाग आहे. संबंधित प्रकल्प २००३ मध्ये मंजूर करण्यात आला होता. चिनाब पूल केवळ एक पूल नाही तर भारताच्या अभियांत्रिकी क्षमतेचा जिवंत पुरावा आहे. या पुलामागे प्रा. माधवी लता यांचे १७ वर्षांचे कठोर परिश्रम, समर्पण आणि कौशल्य आहे. त्यांचे काम येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत ठरेल यात शंका नाही.

## आईला समजावून सांग

काय करू?



मी विवाहिता असून लग्नाला तीन वर्षे झाली आहेत. आमचं वैवाहिक आयुष्य सुरळीत सुरू आहे. पण माझ्या आईमुळे आम्हा दोघांमध्ये वाद होत आहेत. तिचा आमच्या आयुष्यातला हस्तक्षेप गरजेपेक्षा वाढला आहे. यामुळे माझे पती खूप वैतागतात. याबाबत वारंवार सांगूनही आईच्या वागण्यात सुधारणा होत नाही. कोणताही निर्णय घेण्याआधी तिला विचारावं लागतं. तिच्या अशा वागण्यामुळे आमच्यात उगाच दुरावा निर्माण झाला आहे. मी आईला कसं समजवू?

– बरेचदा पालक मुलांच्या आयुष्यात गरजेपेक्षा जास्त हस्तक्षेप करतात. आईचा हस्तक्षेप थांबवण्यासाठी तू पुढाकार घ्यावा. आईला भेटून शांतपणे बोल. तिच्या या हस्तक्षेपामागची कारणं जाणून घे. तिच्याशी थोडं अंतर ठेवायला सुरुवात कर. आठवड्यातला काही वेळ तिच्यासाठी ठेव. त्याच वेळेत तुझ्याशी बोलणार असल्याचं स्पष्टपणे सांग. तुझ्या लग्नानंतर आलेलं रिकामेपण घालवण्यासाठी तिने हा मार्ग स्वीकारला असावा. आईला कामात व्यस्त ठेवण्यासाठी काय करता येईल हे ठरव. पतीसोबतचा दुरावा दूर करण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल

## असे निवडा ऑफिसवेअर

लाईफस्टाईल



कॉर्पोरेटजगतात यशाची पायरी चढण्यासाठी क्षमतेसोबतच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणं गरजेचं असतं. या जगतात फॉर्मल वेअरवर भर दिला जातो. सध्या पॉवर ड्रेसिंगचा जमाना आहे. या क्षेत्रात गबाळं राहून चालत नाही. तुमच्या दमदार व्यक्तिमत्त्वाची छाप पडणं आवश्यक असतं. म्हणूनच तुमचा ड्रेसिंग सेन्स उत्तम हवा. या दृष्टीने तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवण्यासाठी काही टिप्स नक्कीच उपयुक्त ठरू शकतील.

* कपड्यांच्या फिटिंगकडे लक्ष द्यायला हवं. खूप ढगळ किंवा खूप तंग कपडे घालू नयेत.

* क्लासिक कट जॅकेट आणि योग्य फिटिंग असणारी ट्राउजर हा पेहराव खूप छान दिसतो.

* कॅज्युअल लूकलाही थोडा फॉर्मल टच देता येईल. क्रिस्प व्हाईट टॉप किंवा शर्टसोबत गडद रंगाची जीन्स घालता येईल.

* स्ट्रेट कट पँटवर शर्ट ड्रेस कॅरी करता येईल.

* सलवार कुर्ता, कुर्ता लेगिंग असे पर्यायही आहेत. बाजारात ऑफिसवेअर कुर्ते मिळतात. हे आकर्षक पण सोबर कुर्ते घालता येतील. ऑफिससाठी कुर्ते निवडताना रंग आणि डिझाइनकडे विशेष लक्ष द्या. फार भडक रंग आणि बटबटीत डिझाइन टाळा.

* फॉर्मल पेहराव निवडताना काळा, पांढरा, ग्रे, नेव्ही ब्लू, ऑफ व्हाईट अशा रंगांना प्राधान्य दिलं जातं. यासोबत आईसी ब्लू, मिंट ग्रीन, चॉकलेटी, पिवळ्या रंगाच्या कपड्यांची निवड करता येईल.

* व्यक्तिमत्त्व भारदस्त दिसण्यासाठी फॉर्मल वेअरसोबत स्कार्फ कॅरी करता येईल.

## श्रावणातले आहारव्रत

स्टे फिट

आध्यात्मिक दृष्टिकोनातून पवित्र मानला जाणारा श्रावण आरोग्याच्या दृष्टिकोनातून मात्र अत्यंत संवेदनशील असतो. या काळात वातावरणातील उच्च आर्द्रता आणि तापमानातील बदलांमुळे बॅक्टेरिया अत्यंत वेगाने वाढतात. अशा परिस्थितीत काही अन्नपदार्थांचे सेवन आरोग्याला हानी पोहोचवू शकते. त्यामध्ये दूध आणि दही प्रमुख आहेत. म्हणूनच याचे सेवन करताना काळजी घ्यायला हवी.

दूध आणि दही हे नाशवंत पदार्थ हवेतील आर्द्रतेमुळे लवकर संक्रमित होतात. असे संक्रमित पदार्थ खाल्ल्यामुळे विषबाधा, पोटदुखी आणि आम्लता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. खेरीज या ऋतूत पचनशक्ती कमकुवत होते. स्वाभाविकच दूध आणि दही जड असल्यामुळे पचन कठीण होते. यामुळे अपचन किंवा गॅसची समस्या उद्भवू शकते. आयुर्वेदानुसार, श्रावणात शरीरातील वात आणि कफ दोष वाढतात. दूध आणि दह्याचे सेवन हे दोष आणखी वाढवू शकतात. असे झाल्यास सर्दी, खोकला, फ्लू आणि ॲलर्जी होऊ शकते. म्हणूनच या महिन्यात विशेषतः रात्रीच्या वेळी दही, दूध आणि ताक खाऊ नका. हिरव्या पालेभाज्याही स्वच्छ धुवून खाव्या कारण त्यात घातक जंतू असण्याची शक्यता असते.

या काळात पचनास जड ठरणारे तेलकट आणि तळलेले पदार्थही खाऊ नये कारण ते पचनसंस्थेवर अतिरिक्त भार टाकतात. सध्या कापलेली फळे जास्त काळ ठेवू नका कारण त्यावरही बॅक्टेरिया वेगाने वाढतात. या दिवसात थंड पेये किंवा आईस्क्रीमसारखे पदार्थही वर्ज्य करावे.



**श्रावणात काय खावे?**

* मूग डाळ खिचडी, फळे, सूप यासारखे हलक्या आणि पचण्यास सोपे अन्नघटक

* उकडलेल्या किंवा वाफवलेल्या भाज्या

* तुळस, आले आणि काळी मिरी यासारख्या नैसर्गिक आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या घटकांपासून तयार केलेले गरम पाणी आणि हर्बल टी.

## संवादात मोकळेपणा हवा

संगोपन

आठ ते १० वर्षे वयोगटातील मुलींना मासिक पाळीबद्दल माहिती देणे योग्य मानले जाते. तथापि, आता मुलींबरोबरच मुलांनाही मासिक पाळीबद्दल माहिती देणे गरजेचे समजले जात आहे. त्यांच्यातील महिला-मुलींविषयीची जागरुकता, समानता आणि आदराची भावना वाढण्यास ही बाब महत्त्वपूर्ण ठरणारी आहे.

मुलींच्या मासिक पाळीबद्दल मुलांना योग्य माहिती दिली गेली नाही तर ते ही बाब विचित्र किंवा घाणेरडे मानू शकतात. यातूनच काहीजण त्याची खिल्ली उडवतात. मात्र मुलांना योग्य वयात मासिक पाळी ही एक नैसर्गिक आणि आवश्यक प्रक्रिया असल्याचे समजते तेव्हा ते घरातील आई, बहिणी वा नात्यातील अन्य महिलांबद्दल आदर दाखवतात. ते मुलींच्या या काळातील वेदना, थकवा किंवा मूड स्विंग यासारख्या गोष्टींकडे वेगळ्या समजुतीने पाहू शकतात. म्हणूनच नऊ ते ११ वर्षे हे मुलांना याबद्दल प्राथमिक माहिती देण्यासाठी योग्य वय असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**कसे समजावून सांगावे?**



सोप्या आणि स्पष्ट भाषेत हे सांगता येईल. उदाहरणार्थ, तुम्ही म्हणू शकता की, मुली मोठ्या होतात तेव्हा त्यांच्या शरीरात काही बदल होतात. त्यापैकी एक म्हणजे मासिक पाळी. यामध्ये दर महिन्याला त्यांच्या शरीरातून थोडे रक्त बाहेर पडते. ही पूर्णपणे सामान्य आणि निरोगी प्रक्रिया आहे. हे स्पष्ट करताना मासिक पाळी ही एक नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया असल्याचे त्यांना सांगता येईल. मुलाने काही विचारले तर मोकळेपणाने उत्तर द्या. खेरीज मुलांसाठी मासिक पाळीची शास्त्रीय माहिती देणारी अनेक पुस्तके आणि व्हिडिओही आता उपलब्ध आहेत. तुम्ही त्याचीही मदत घेऊ शकता.

पहिली मासिक पाळी नऊ ते १३ वर्षांच्या दरम्यान कधीही येऊ शकत असल्यामुळे मुलीला काय होणार आहे, हे आधीच माहीत असणे चांगले. यामुळे तिला भीती किंवा चिंता वाटत नाही. मुलांना या वयात, होणाऱ्या अन्य शारीरिक बदलांचीही माहिती द्यायला हवी. पालक किंवा शिक्षक योग्य वेळी योग्य माहिती देत नसतील तर मुले मित्रांकडून किंवा इंटरनेटवरून अपूर्ण किंवा चुकीची माहिती मिळवू शकतात. याचे अनेक दुष्परिणाम सध्या चर्चेत आहेत.

म्हणूनच मुलांना काय करू नये हे शिकवा. मासिक पाळीची खिल्ली उडवणे चुकीचे आहे, हे समजावून सांगा. सॅनिटरी पॅड ही सामान्य बाब असल्याचे त्यांना समजायला हवे. या काळात आई किंवा बहिणीला घरी मदतीची आवश्यकता असेल, तर मदत करणे ही एक जबाबदारी असल्याचे त्यांना वेळीच समजायला हवे.

### स्कीन केअर

#### मिळेल हवाहवासा उजाळा



पावसाळ्यात चेहऱ्याचा तजेला कायम ठेवण्यासाठी नैसर्गिक घटकांनी युक्त फेस पॅकचा वापर करता येईल. यासाठी चमचाभर दही, चिमूटभर हळद, अर्धा चमचा मध आणि एक चमचा मसूर डाळीची पूड घ्यावी लागेल. आता हे सर्व घटक एकत्र करून पेस्ट तयार करा. ही पेस्ट स्क्रबरचं काम करेल. यामुळे चेहऱ्यावरची मृत त्वचा निघून जाईल. हा पॅक लावण्याआधी चेहरा स्वच्छ धुवून घ्या. मग या पॅकने चेहऱ्यावर मसाज करा. पॅक वाळल्यानंतर थंड पाण्याने धुवून टाका. या पॅकमुळे तुमचा चेहरा छान उजळ आणि तजेलदार दिसू लागेल.

### मेक अप


#### मस्कारा लावताना...



मस्कारा लावताना बरीच काळजी घ्यावी लागते. बरेचदा तो पापण्यांना चिकटतो. जुना झाल्यास किंवा ब्रशमध्ये गरजेपेक्षा जास्त मस्कारा भरल्यास पापण्यांना चिकटून बसतो. यामुळे लूकचा विचका होतो. हे टाळण्यासाठी मस्कारा वरचेवर बदलायला हवा. त्याचे आयुष्य तीन ते चार महिन्यांचं असतं. त्यामुळे यापेक्षा अधिक काळ मस्कारा वापरू नये. तसंच ब्रश मस्कारामध्ये फार बुडवू नका. या उपायांमुळे तुमचा मस्कारा पापण्यांना चिकटणार नाही.

### फूट केअर

#### टाचांच्या भेगा करा दूर



पावसाळ्यात टाचांना भेगा पडतात. या भेगांमुळे पाय खूपच खराब दिसतात. हा त्रास टाळण्यासाठी शक्यतो पाय कोरडे ठेवा. मोजे घालायला सुरुवात करा. तेल आणि मॉईश्चरायझरचं काम करतं. त्यामुळे तेलाने टाचांना मसाज करा. या तेलात थोडी हळद घाला. भेगांमधून रक्त येत असेल तर त्यावर तेल आणि हळदीचा लेप लावा. यामुळे पायांच्या भेगा कमी होतील.

# लाडक्या दाजींवर कारवाई होणार!

## गुन्हा दाखल करून लाभ रक्कम वसूल करणार : २६ लाख लोकांच्या डेटा व्हेरिफाय कामाला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अल्पावधीतच लोकप्रिय ठरली. गरीब आणि गरजू महिलांसाठी राबवण्यात आलेल्या या योजनेचा लाभ तब्बल दोन कोटी महिलांनी घेतला.

मात्र, निवडणुकीच्या काळात योग्य पडताळणी न झाल्याचा गैरफायदा घेत काही पुरुषांनीही या योजनेत नाव नोंदवून सरकारी मदतीचा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आता या पुरुषांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार असून, बोगस लाभार्थ्यांकडून लाभ रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकारामुळे शासनाच्या हेतूवर अनेकांनी शंका उपस्थित करून पडताळणी प्रकियेवर आक्षेप नोंदवला होता. तसेच लाडकी बहीण योजना ही मतांसाठी सुरू केलेली होती, अशी टीकाही विरोधकांनी सरकारवर केली होती.



दरम्यान, लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर दरवर्षी सुमारे ४६ हजार कोटी रुपयांचा भार येत असून, त्यामुळे तातडीने खात्रीशीर पडताळणी करून गैरफायदा घेतलेल्या सर्व प्रकरणांवर कठोर पावले उचलण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्य सरकारच्या माहितीनुसार, जवळपास १४ हजार पुरुषांनी लाडकी बहीण योजनेअंतर्गत आर्थिक मदत घेतली आहे. या प्रकारानंतर सरकारवर मोठ्या प्रमाणात टीका झाली असून, योजनेतील पडताळणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. सरकार आता यावर कठोर पावले उचलण्याच्या तयारीत असून, संबंधित पुरुषांवर कारवाईसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. सूत्रांनुसार, बोगस लाभार्थी म्हणून नोंद झालेल्या पुरुषांकडून ११ महिन्यांचे लाभाचे पैसे म्हणजेच प्रत्येकी १६ हजार ५०० रुपये वसूल केले जाणार आहेत. यासोबतच शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. दरम्यान, महिला व बालकल्याण विभाग आणि केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या समन्वयाने मिळालेल्या २६ लाख खात्यांची पडताळणी सुरू झाली आहे. काही महिलांनी स्वतःचे खाते नसल्यामुळे कुटुंबातील पुरुषांचे बँक खाते या योजनेसाठी जोडले होते.

अशा महिलांचा लाभ पुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे. मात्र, ज्या प्रकरणांत बोगस माहिती देत योजनेचा लाभ घेण्यात आला आहे, त्या सर्व खात्यांची चौकशी करून कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

# आम्ही बदनाम होणार असू तर...

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ६ :
सरकार आम्ही चालवितो, तुमचे काम अंमलबजावणी करण्याचे. त्यात हयगय कराल तर आम्ही बदनाम होणार. मग तुमचे काय ? असा सवाल जर होत असेल तर मग प्रशासनाच्या भीतीला पारावार राहणार नाही. हेच चित्र जिल्हा प्रशासनात आज दिसत असून सर्व शासकीय फाईल्स ठप्प पडल्याची चर्चा आहे. आज ताजे चित्र असे की सर्व अधिकारी प्रथमच थंब वेळेवर करीत असल्याचे जिल्हा प्रसासनाचा लिपिक सांगतो.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेली बैठक. त्यास सात दिवस लोटतात. त्या बैठकीत मंत्री बावनकुळे यांनी सगळ्यांना धारेवार धरले. तुझे किती एजेंट ते सांगू का? असा थेट सवाल केला.

अधिकारी गांगरले. गयावया झाली. पण महसूल मंत्र्यांनी त्यांच्या खात्याचा अतिरिक्त प्रभार सांभाळणाऱ्या शासनाच्या प्रधान सचिवास थेट फोन लावला. या अधिकाऱ्यांस निलंबित करा, असे आदेश दिले. तसेच नागपूर विभागीय आयुक्तांना फोन लावत काही तहसीलदार यांची वेतनवाढ थांबविण्याची सूचना केली. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांची प्रशंसा करतांनाचा या अश्या अधिकाऱ्यांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला.

एक दोन प्रकरणात काही अधिकाऱ्यांवर चांगलीच बेतणार होती. पण एका आमदाराने, सध्या मेमोच द्या, कठोर कारवाई पुढे बघता येईल, अशी शिफारस केल्याने अधिकारी वाचला. उपस्थित सर्व आठही तहसीलदार यांना धारेवार धरण्यात आले.

त्यांच्या मध्यंस्थांची यादीच हाती असल्याचे सांगण्यात आल्याने तहसीलदार घामाघूम. पण यांना सुधारणा करण्याची एक संधी दिली पाहिजे, अशी विनंती एका लोकप्रतिनिधिने केली तेव्हा बावनकुळे यांनी पुढच्या बैठकीत सुधारणा कामाबाबत सुधारणा दिसेल, अशी अपेक्षा व्यक्त करीत दिलासा दिला. आज आठ दिवस होत आहे पण एकही वरिष्ठ भीतीतून बाहेर निघाल्याचे दिसत नसल्याचे एक भाजप नेता सांगतो. खरे तर पत्रकारांनी या भीतीग्रस्त व पुढे काय या चिंतेत असणारा अधिकारी वर्ग बोलता केला पाहिजे, अशीही मल्लिनाथी भाजप नेते करतात.

मंत्री बावनकुळे यांनी दिलेली तंबी व कठोर कारवाई करण्याचा ईशारा याबाबत कुणीही अधिकृत बोलायला तयार नाही. केवळ घडले ते खरे, हाच दुजोरा मिळतो, पण प्रशासन गपगार झाल्याचे दिसते अशी टिपणी येते.

अखेर आमदार सुमित वानखेडे यांनी मंत्री बावनकुळे यांनी घेतलेल्या बैठकीत अधिकारी वगार्ची झाडाझडती घेतली, ही बाब खरी असल्याचे मान्य केले. विचारणा केल्यावर ते म्हणाले की अधिकारी वर्गाच्या उदासीनतेमुळे सरकार बदनाम होणार असेल तर खपवून घेणार नाही.

लोकप्रतिनिधी वर्गास ऐकून नं घेण्याची बाब अक्षम्य. यापुढे बदल दिसून नं आल्यास कठोर कारवाई केल्या जाईल, असे बावनकुळे यांनी बजावल्याचे आमदार सुमित वानखेडे यांनी लोकसत्ता सोबत बोलतांना स्पष्ट केले. रात्री सलग चार तास चाललेल्या या मॅरेथॉन बैठकीत बहुतांश अधिकारी वगार्ची भंबेरी उडाली. इशारा मिळालेल्या काहींपैकी सुट्टीवर गेले असून आज जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयात बावनकुळे यांनी दिलेल्या तंबीचा भितियुक्त परिणाम दिसून येत असल्याचे स्थानिक भाजप पदाधिकारी बोलत आहे.

# चंद्रपूर-चिमूर रस्त्यावर एसटी बस उलटली

## उपचारादरम्यान चालकाचा मृत्यू : सुमारे १२ प्रवासी जखमी



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ६ :
चंद्रपूरमधील चिमूर रोडवर एक भीषण अपघात घडला. या अपघातात एसटी बस उलटून अपघात झाला, ज्यामध्ये चालकाचा मृत्यू झाला तर सुमारे १२ प्रवासी जखमी झाले. ही घटना चारगावजवळ घडली.

चंद्रपूर-चिमूर मार्गावर धावणारी एसटी बस चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर बस स्थानकातील चारगावजवळ पलटी झाली. या भीषण अपघातात बस चालक सुरेश भटारकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर १० ते १२ प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. जखमींवर वरोरा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही बस चिमूरहून चंद्रपूरला येत असताना अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याने घसरून उलटली. अपघातग्रस्त बस चारगावजवळ उलटली. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी पोहोचून जखमींना तातडीने रुग्णालयात नेले.

# १०९ शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई

**केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नांना यश**

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ६ :
पेनटाकळी प्रकल्पातील पाणी पाझरामुळे नुकसान झालेल्या पणअहवाल यादीतुन सुटलेल्या तब्बल 109 शेतक?यांना नुकसान भरपाई देण्याचा महत्वपुर्ण निर्णय विदर्भ पाटबंधारे नियामक मंडळाच्या बैठकीत झाला आहे.

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कडे अनेक शेतक?यांनी नुकसानग्रस्त अहवाल यादीत नांव नसल्याच्या तक्रारी केल्या होत्या . या तक्रारींची दखल घेत त्यांनी संबधित विभागाला सुचित केले होते. त्यांनुसार निर्णय घेण्यात आला आहे.

बुलढाणा जिल्हयातील पेनटाकळी प्रकल्पातील मुख्य कालवा अंतर्गत ० ते ११ मधील शेतकऱ्यांचे पाणी पाझरामुळे नुकसान झाले होते. परंतु नुकसान अहवाल यादीमधुन काही शेतकरी सुटले होते. या शेतकऱ्यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या कडे या संदर्भात तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार संबधित विभागाला सुचित केले होते.

जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत पेनटाकळी प्रकल्पाच्या मुख्य कालवा कि. मी. ० ते ११ मधील पाणी पाझरामुळे झालेल्या नुकसान एकुण १०९ शेतकऱ्यांचे एकुण ६६.२७ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे करण्यात येऊन एकूण किंमत रु. ८६,४८,२३५/- एवढ्या रक्कमेचा नुकसान भरपाईचा प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली आहे. या पुर्वीही 5.39 कोटींची शेतकऱ्यांना मिळाली नुकसान भरपाई

पेन टाकळी प्रकल्पातील मौजे-दुधा व रायपुर या शिवारातील शेतजमीनीत जास्त प्रमाणात पाझर आढळुन आला, त्यामुळे पाझराबाबत शेतक-यांच्या तक्रारी येत गेल्याने प्रतापराव जाधव यांनी मुख्य कालव्याच्या पाणी पाझरामुळे झालेल्या नुकसानीचा सर्व्हेक्षण करुन नुकसान भरपाईचा प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचविले होते.

त्या अनुषंगाने संयुक्त नुकसानीचा अहवाल तयार करण्यात आला. सन २००३ ते २०२० पर्यंत ज्या वर्षी कालव्याव्दारे सिंचन झाले त्यावषीर्चा नुकसान भरपाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला. नुकसान भरपाईची परिगणना करतांना महसुल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार करून संपुर्ण प्रस्ताव मंजुरीस्तव शासनास सादर करण्यात आला.

सदर नुकसान भरपाईच्या प्रस्तावास नियामक मंडळाच्या ठराव क्रं. ८२/१७ नुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर अंतर्गत पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलढाणा या प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून होणा-या पाण्याच्या पाझरामुळे पेनटाकळी, दुधा, रायपुर व पांचला ता. मेहकर या चार गावाच्या शिवारातील एकुण ४३२.१५ हेक्टर बाधीत झालेल्या क्षेत्राकरिता रु. ५.३९ कोटी रुपये एवढया रकमेस नियामक मंडळाची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

# महासागरच्या संमेलनात पुरस्काराचा वर्षाव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

दैनिक महासागर वृत्तपत्र समुहाच्या अर्धवार्षिक संमेलनात विदर्भासह मुंबई, पालघर, नाशिक येथील प्रतिनिधींना त्यांच्या विशेष कामगिरीबद्दल पुरस्कृत करण्यात आले. माहेश्वरी भवन, टेकडी रोड, नागपूर येथे रविवारी आयोजित या संमेलनात मुख्य अतिथी म्हणून डॉ. गिरीश गांधी बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ता अनिल अहिरकर यांच्यासह महासागर वृत्तपत्र समुहाचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, व्यवस्थापकीय संचालक राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, ममता चांडक, सरिता चांडक, सीईओ उमाशंकर लाल मंचावर उपस्थित होते.



## संकल्प सह्याद्रीचा हॉर्नबिल संवर्धनाचा

**लोकजागर**

: लोकसेवार्थ :
कोकणातील देवरूख (जि. रत्नागिरी) येथील सह्याद्री संकल्प सोसायटी या स्वयंसेवी संस्थेने दुर्मीळ वृक्षांचे संवर्धन, संरक्षण आणि रोपांच्या लागवडीकडे लक्ष दिले आहे. तसेच संस्थेतील तज्ज्ञ दुर्मीळ प्रजातींवर संशोधन करत आहेत.



संस्थेने शालेय विद्यार्थी आणि लोकसहभागातून पर्यावरण संवर्धनाला गती दिली आहे. सह्याद्री डोंगररांग तसेच कोकणातील जंगल परिसरात आंबा, काजू, अननस, रबर लागवड मोठ्या प्रमाणात होत आहे. याचबरोबरीने शेकडो वर्षांपासून टिकून राहिलेला जंगल पट्टा आणि देवराया अलीकडच्या काळातील विकास प्रकल्प, रस्ते आणि मंदिर जीर्णोद्धार, खाणकाम, महामार्ग निर्मितीमध्ये नष्ट होत आहेत.

त्याचा मुख्य परिणाम जंगल वैविध्य, पाणीसाठा आणि गावशिवारातील शेतीवर झाला आहे. पर्यावरणाचा झपाट्याने होणारा ऱ्हास लक्षात घेऊन सह्याद्री संकल्प सोसायटी या स्वयंसेवी संस्थेने वनीकरण, देवराया संवर्धन आणि दुर्मीळ वृक्षांच्या लागवडीकडे लक्ष दिले आहे.

पर्यावरण, पशू-पक्ष्यांच्या संवर्धनाबाबत लोकांमध्ये जनजागृती केली जात आहे. लोकसहभागातून विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. संस्थेतील तज्ज्ञ कोकणातील सड्यांचा शास्त्रीय अभ्यास करत आहेत. यासाठी दीपकाडी महोत्सव, जनजागृती कार्यशाळा, क्षेत्र भेटी आयोजित केल्या जातात. संस्थेच्या माध्यमातून २०१७ पासून प्रोजेक्ट हॉर्नबिल'चे काम सुरू आहे. धनेश (हॉर्नबिल) ही पक्ष्यांची एक संकटग्रस्त प्रजाती आहे.

धनेश पक्ष्याला स्थानिक भाषेत ककणेर, काकण, गरुड, माडगरुड नावाने ओळखतात.

महाराष्ट्रात मुख्यतः कोकण परिसरातील जंगल, देवराया, फळबागा आणि सह्याद्रीच्या उतारावरील जंगलामध्ये महाधनेश (ग्रेट हॉर्नबिल), कवड्या धनेश किंवा मलबारी धनेश (मलबार पाइड हॉर्नबिल), मलबारी राखी धनेश (मलबार ग्रे हॉर्नबिल) आणि राखी धनेश (इंडियन ग्रे हॉर्नबिल) या प्रजाती आहेत. यातील महाधनेश, कवड्या धनेश आणि मलबारी राखी धनेश या संकटग्रस्त प्रजाती आहेत.

धनेश पक्षी फलाहारी असून काही प्रमाणात लहान पक्षी, उंदीर, कीटक देखील खातात. सर्व प्रजाती वड, पिंपळ, उंबर, धेंड उंबर, करवत, पिंपरी, नांदरुख वृक्षांची फळे खातात. याव्यतिरिक्त काजरा, जायफळ, मायफळ, बकुळ, लिंबारा, चांदफळ, जंगली बदाम, कुकर, रान जायफळ, जांभूळ, करवंद अशा अनेक फळांचा आहारात समावेश आहे. धनेशपक्षी वृक्षांची फळे खाऊन त्यांच्या बिया विष्ठेतून सर्वदूर पोहोचवतात.

धनेश खाद्य झाडांची रोपवाटिका, खाद्य झाडांचे पुनर्रोपण, अधिवास पुनर्निर्मिती, कृत्रिम घरट्यांचा वापर आणि जनजागृती यामधून धनेश संवर्धनाचा जागर सुरू झाला आहे. सह्याद्रीच्या पायथ्याशी असणारी वीस गावे, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये धनेशमित्र निसर्ग मंडळांची स्थापना करून त्याद्वारे जनजागृती आणि संवर्धनाचे कार्य होत आहे. मोठ्या झाडांवर वेली वाढणे, वादळाने फांदी तुटणे अशा कारणाने धनेश ढोलीचा वापर थांबतो. कायमस्वरूपी उपाय जरी अधिवास पुनर्निर्मिती आणि झाडे वाढवणे हा असला तरी यासाठी लागणारा कालावधी फार मोठा आहे. म्हणून तात्पुरती कृत्रिम घरटी वापरून धनेश पक्ष्यांना तात्पुरता सहारा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही घरटी झाडाच्या बुंध्याला साधारण तीस ते पन्नास फुटावर बांधली जातात. घरटे स्वीकारल्यानंतर फळे, विष्ठा यांचा वापर करून हा पक्षी घरट्याचे छिद्र बुजवत असल्यामुळे त्यांच्या नैसर्गिक प्रजनन प्रक्रियेत कोणताही बदल होत नाही. धनेशाची ढोली असणारी झाडे आणि राया लोकसहभागातून दत्तक घेऊन दीर्घ मुदतीचे करार करून तोडीपासून संरक्षित केली जात आहेत. खासगी जंगले संरक्षित करून धनेश पक्ष्यांसाठी संरक्षित राखीव जंगल घोषित व्हावे, यासाठी विविध पातळीवर संशोधन करून त्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे देण्यात येत आहे.

■ ■ ■

## ८-१० ऑगस्ट दरम्यान विदर्भात मुसळधार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
भारतीय हवामान विभागाच्या मुंबई वेधशाळेने दिलेल्या पाच दिवसांच्या हवामान अंदाजानुसार, महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांत मध्यम ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ६ ऑगस्टपासून १० ऑगस्ट पर्यंत कोकण, घाटमाथा, मराठवाडा आणि विदर्भ यामध्ये पावसाचे प्रमाण अधिक असणार आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांना यलो तर काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट दिला गेला आहे. विशेषतः कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पुणे, सातारा घाटमाथा यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्रात पुढील पाच दिवस पावसाचा जोर राहणार असून हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलावीत. शेतकरी, विद्यार्थी, वाहनचालक व पर्यटकांनी हवामान अपडेट्सवर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

मराठवाड्यातील लातूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव याठिकाणी देखील ७ व ८ ऑगस्ट रोजी मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा आहे. विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, अकोला, बुलढाणा, अमरावती या जिल्ह्यांमध्ये ८ ते १० ऑगस्ट दरम्यान पावसाचा प्रभाव वाढणार आहे. यामुळे शेतीकामावर परिणाम होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

६ ऑगस्टपासून सुरुवात होणाऱ्या पावसाच्या सत्रात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरसह घाटमाथ्याचे जिल्हे सर्वाधिक प्रभावित होणार आहेत. या भागांमध्ये पावसाचा जोर अधिक असणार असून दरडी कोसळण्याचा धोका वाढू शकतो. कोकण किनारपट्टीवर मुसळधार पावसामुळे पूरसदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता असून, खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे.

## : शुन्यातून विश्व :
## लोकांची भूक भागविणारी रिसोर्ट इंडिया

चाकण औद्योगिक क्षेत्रात येलवाडी येथील युवक विजय बोत्रे यांनी अल्पावधीत ठसा उमटवला आहे. पारंपरिक व्यवसायाला फाटा देऊन स्थानिक तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय करावा, हा ध्यास घेऊन बोत्रे यांनी औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमधील कर्मचारी व कामगारांना चोवीस तास कंपनी पोच पद्धतीने नास्ता व जेवण पुरवणारी अत्याधुनिक पद्धतींचा वापर केलेली अधिक रिसॉर्ट इंडिया प्रा. लि. या कंपनीची स्थापन केली. कंपनीचे अत्याधुनिक किचन खालूंब्रे ( ता.खेड ) येथे सुरु केले. आज या कंपनीची वार्षिक उलाढाल चार ते पाच कोटीपर्यंत गेली आहे. त्याचबरोबर ओझारा डायनिंग हॉल या हॉटेलचीही निर्मिती केली.



शेतकरी कुटुंबातील युवक, घरची परिस्थिती बेताची असल्याने श्री. बोत्रे यांनी कसेबसे दहावी पर्यंत शिक्षण घेतले. सन १९९१ मध्ये त्यांनी वाळूचा धंदा सुरु केला. त्यात अडचणी निर्माण झाल्याने त्यांनी हा धंदा बंद करून निगडी प्राधिकरणात हार्डवेअरचे दुकान सुरु केले. मात्र याही व्यवसायात त्यांना रस न वाटल्याने पिंपरी-चिंचवड परिसरात भाग्यश्री डायनिंग हॉल या नावाने त्यांनी हॉटेल सुरु केले.

हॉटेल चालवत असताना चाकण परिसरात औद्योगिक वसाहत वाढते आहे, हे त्यांनी हेरले, त्यामुळे या वसाहतीतील कंपन्यांतील कामगार व कर्मचारी यांना चहा, नाष्टा व जेवण यांची सुविधा देण्यासाठी त्यांनी २००४ मध्ये खालूंब्रे गावात एक एकर जमिनीवर अद्यावत शेड उभारून अधिक रिसॉर्ट इंडिया प्रा. लि. ची स्थापना केली. या कंपनीच्या माध्यमातून त्यांनी महिंद्रा व्हेइकल्स लि., केहीन फाय, लुकास, टीव्हीएस, बडवे ऑटो, पानसे ऑटोकॉम्प, कला जनसेट, थाई सुमित व इतर मोठ्या उद्योगांना जेवण, नाश्ता व चहाची २४ तास सेवा उपलब्ध करून दिली.

कंपनीमध्ये सध्या दीडशे कामगार आहेत. त्यात महिलांचाही समावेश आहे.

सौर उर्जेवर जेवण बनविले जाते. फळभाज्या कापण्यासाठी अत्याधुनिक यंत्र सामुग्रीचा वापर केला जातो. अत्याधुनिक यंत्र सामुग्रीमुळे शंभर किलो तांदळाचा वीस मिनिटांत चांगला भात होतो. वीस मिनिटात २००० कप चहा तयार होतो. दररोज वीस हजाराहून जास्त चपात्या बनविल्या जातात. खाद्य पदार्थ ने-आण करण्यासाठी स्थानिक तरुणांना रोजगार देऊन त्यांची वाहने भाड्याने घेतली आहेत.

दररोज चार ते पाच हजार लोकांसाठी जेवण व इतर खाद्य पदार्थ बनविले जातात. यामध्ये दाक्षिणात्य, उत्तर भारतीय, महाराष्ट्रीयन, थाई, स्पॅनिश, जापनीज, अमेरिकन आदी प्रकारचे शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थ बनविले जातात. यासाठी आचारी काम करणाऱ्यांना उत्तम प्रशिक्षण दिले जाते.

हे आचारी बंगाल, गढवाल, बिहार तसेच महाराष्ट्रातील आहेत. कंपनीला दररोज पाचशे लिटर दूध लागते. हे दूध पिशव्यांमधील न वापरता स्थानिक शेतकऱ्यांकडून घेतले जाते. याबाबत बोत्रे म्हणाले कि, व्यवस्थापक, सुपरवायझर असले तरी मी व माझी पत्नी साधना आम्ही व्यवस्थापन पाहतो. या व्यवसायाची सुरुवात माझे मित्र शिवाजी वर्पे, संजय माळी, बाळासाहेब काशीद, बापूसाहेब भेगडे यांच्या सहकायार्ने केली. कंपनीत स्वच्छतेला अधिक महत्व दिले जाते. उत्कृष्ट प्रतीचा भाजीपाला, फळभाज्या, कडधान्ये, डाळी खरेदी केल्या जातात.

खरकाट्यामुळे अस्वच्छता होऊ नये, म्हणून कंपनीजवळ बायोगॅस प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पातून एक शेगडी बारा तास चालून इंधनाची बचत केली जाते.मागील तीन वर्षांपूर्वी बोत्रे यांनी परदेशी कंपन्यांची गरज ओळखून अमेरिकेतील डेट्रॉईट शहरात हि केटरींग कंपनीची स्थापना केली असून ते स्वतः तेथील व्यवस्थापन पाहतात. शिवाय परदेशातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच अधिक रिसॉर्ट लगत ओझारा डायनिंग हॉल या नावाने हॉटेल व्यवसाय सुरु केला आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com